# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१३ |
| वर्ष | : | सत्तेचाळिसावे |
| अंक | : | चौथा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१२**

**गणपत्रिका क्रमांक : १७४**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष सत्तेचाळिसावे अंक चौथा मार्गशीर्ष/पौष शके १९३४, जानेवारी २०१३

## *संपादकीय*

## 'मी कोण?'

'मी कोण आहे' याचे उत्तर आजही शास्त्रज्ञ शोधताना दिसत आहेत. अर्थातच हा प्रश्न खूप जुना असून सर्वच सभ्यतांनी आपापल्यापरीने त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात भारतीय तत्त्वज्ञानातील त्याची चर्चा ही नक्कीच उजवी ठरते. साहजिकच सृष्टीच्या व्युत्पतीचा विचार करणाऱ्या आधुनिक शास्त्रज्ञांपैकी श्र्रॉडिंगरपासून काप्रापर्यंत सर्वांनाच भारतीय तत्त्वज्ञानामध्ये या विषयाची गंभीर चर्चा आढळून येते. डार्विनच्या उत्क्रांतिवादाने मानवाच्या बाह्य सांगाड्याचा एकपेशीय ते बहुपेशीय प्रवास उलगडून दाखवला. विज्ञानामध्ये अज्ञानाचा एखादा डोंगर सर केल्यानंतर समोरील अथांग दऱ्याडोंगर अजून पार करायचे लक्षात येते. हाच काहीसा प्रकार उत्क्रांतिवादामध्ये झाला आहे. सुटणारा प्रत्येक प्रश्न नवीन प्रश्नांना जन्म देत आहे.

सर्व जग वस्तुमय आहे, म्हणूनच वस्तूच्या किंवा पदार्थाच्या अंतरंगाचा शोध घेतला की अंतिम उत्तर नक्की मिळणार अशी खात्री १७ व्या ते १९ व्या शतकांतील वैज्ञानिकांना वाटत होती. रसायनशास्त्रापासून ते मानसशास्त्रापर्यंतच्या सर्वच विज्ञान शाखांचा विचार हा पदार्थ विज्ञानाच्या अभ्यासातून होऊ लागला. अर्थातच या रूढ भौतिकशास्त्रावर न्यूटनची विश्वविषयीची कल्पना आणि देकार्तचे पदार्थ व आत्मा यांतील द्वैत यांचा प्रभाव होता. यामुळे विज्ञानाच्या 'वस्तु'निष्ठ अभ्यासातून मानवी अस्तित्व आणि मानवी व्यवहाराचा गाभा असलेल्या भावना, इच्छा, आकांक्षा, द्वेष, संज्ञा या गोष्टी वस्तुमय नसल्यामुळे या अभ्यासातून हद्दपार झाल्या. ज्ञानाच्या उपासनेमध्ये तर्कप्रज्ञा ही अंतःप्रज्ञेपेक्षा श्रेष्ठ ठरू लागली. अर्थातच यामुळे 'मी कोण' या उत्तराच्या जवळ यायच्याऐवजी शुद्ध तर्कावर आधारलेल्या विज्ञानामुळे ती शक्यता धूसर होऊ लागली.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला आइन्स्टाईनचा सापेक्षतावाद आणि मॅक्स प्लँकच्या पुंजवादाने या आधीच्या

(पृष्ठ क्र. ३२ वर)

**इकडे लक्ष द्यावे –**

**१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सभासद, वर्षात केव्हाही होता येते.**

२) आजीव सभासद योजना बंद करण्यात आली आहे. जे सभासद ३१ मार्च २००९ पर्यंत 'आजीव' झाले आहेत. त्यांना अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. त्यांनी एप्रिल २००९ पासून वाढवलेली देणगी विचारात घेऊन योग्य ती ऐच्छिक देणगी पाठवावी परदेशस्थ सभासदांनी ७५ $ देणगी पाठवावी, अशी विनंती आहे.

३) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डी.डी.) **'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट'** या नावाने खालील **पत्त्यावरच** पाठवावी.

**सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,**
द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय,
प्रताप सिनेमासमोर, कोलबाड,
ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१
कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते १ व सायं. ४ ते ७.

ट्रस्टचे बँक खाते ठाणे जनता सहकारी बँक लि. ठाणे भारत सहकारी बँक व भारतीय स्टेट बँक या बँकांमध्ये आहे. मुंबई व ठाणे बाहेरील सभासदांनी वरील बँकां व्यतिरिक्त बँकांवरील धनादेश पाठविल्यास वटणावळ ५० रु. अधिक पाठवावे.

देणगी पाठविताना संपूर्ण नाव, पत्ता व सभासद क्रमांक (सभासद असल्यास) ही माहिती सुवाच्य अक्षरात कळवावी.

**४) खालील ठिकाणी फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर/धनादेश पाठवू नये.**

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी,
१४८, प्रार्थना समाज, गिरगांव,
मुंबई – ४०० ००४.
दूरध्वनी : २३८८ ०६४५

**रविवारी बंद**

सद्धर्म अंकासंबंधी माहितीकरता यांच्याशी संपर्क साधावा.

ब) **श्री. प्रकाश भा. दीक्षित**
३०२, दुर्गा सोसायटी,
कोलबाड, ठाणे ४०० ६०१.
दूरध्वनी : २५४७२००५
दूरभाष : ९८१९६९३१९५

**५) पत्ता बदलला असल्यास ताबडतोब कळवावे.**

६) पाकिटावर सभासद क्रमांकासमोर छापलेल्या त्रोटक अक्षरांचा खुलासा.

१) वा. दे. – वार्षिक देणगीदार सभासद
२) आ. – आजीव सभासद
३) दी. का. – दीर्घकालीन सभासद
४) का.भे. – कायम भेट

'वा. दे.' व 'दी. का.' या अक्षरांसमोर देणगी कधी संपेल ते वर्ष दाखविले आहे.

– संपादक

या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
लेखकांनी या अंकातील त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास, तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा.
– संपादक

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| संध्येतील २४ नावे–व्यत्पत्ती व समानार्थी नामे | ६ |
| हिन्दूधर्म म्हणजे मानवधर्म | ७ |
| ऋग्वेदातील ख्यातंनाम स्त्रिया | १४ |
| अध्याय ७ : ज्ञान विज्ञान योग | २१ |
| अध्याय १० : विभूति योग | २३ |
| गीत कृष्णायन | २६ |
| वेदोपनिषदांतील प्राणसंकल्पना | २८ |


**ऑक्टोबर २०१२ ते डिसेंबर २०१२ पर्यंत दीर्घकालीन सभासदासाठी व ऐच्छिक देणगी देणाऱ्यांची नावे**

**दीर्घकालीन सभासदासाठी**

– संपादक

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) (पृष्ठसंख्या ९६) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्वशीर्षातील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ५० |

**जुने सद्धर्म अंक मिळतील**

सद्धर्मचा पहिला अंक ऑगस्ट १९६५ ला प्रसिद्ध झाला. हा अंक व त्यानंतर ऑक्टोबर १९६५ पासून जानेवारी २०११ पर्यंतचे (एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक सोडून) सर्व अंक 'www.Granthalaya.org' या संकेत–स्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकाना ते download करून मिळू शकतील व त्यांची प्रतही तयार करून घेता येईल, याची नोंद घ्यावी.

एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक काही अडचणीमुळे प्रसिद्ध झाले नाहीत.

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख १४ वा

प्रासोदाऽपि तया हीनोऽरण्यसदृशः स्मृत ।।[२३०]

तिच्या शिवाय राजवाडा देखील अरण्यासारखा आहे.

हिंदु धर्मात कुटुंब व्यवस्थेला किती अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे हे या सुभाषितावरुन दिसते. जिथे आपली पत्नी असेल मग ती जागा एखाद्या झाडाखाली का असेना तेच खरे आपले घर असे ह्या सुभाषिताच्या पहिल्या ओळीत म्हटले आहे.

वृक्षमूलेऽपि दयिता यत्र तिष्ठति तद् गृहम् ।

दयिता-(स्त्री) पत्नी. गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते । असे सुभाषित या पूर्वीच आपण वाचले आहे. कान्तार-(पुं/नपुं) अरण्य.

मालतीमल्लिकामोदं घ्राणं वेत्ति न लोचनम् ।।[२३१]

जाईजुई किंवा मोगरी यांचा वास नाकच जाणू शकते डोळा नव्हे. पाहिजे जातीचे येऱ्याग बाळ्याचे काम नव्हे. घ्राणं-(पुं/नपुं) नाक वेत्ति-विद् २ प.प. जाणतो. सुभाषिताची पहिली ओळ :-

गुणानामन्तरं प्रायः तज्ज्ञो जानाति नेतरः ।
गुणागुणांमधील वैशिष्ट्य तज्ञच जाणू शकतात इतर नव्हे-

हालाहालं तु दुष्टानां देहे सर्वत्र संस्थितम् ।।[२३२]

दुष्टांच्या संपूर्ण शरीरातच विष पसरलेले असते. दुष्टांच्या मनात कृतीत सर्वत्र दुष्टता म्हणजे विषच असते. सुभाषितकार म्हणतात. समुद्रमंथनातून जे विष बाहेर आले ते खरे विषच नव्हे. त्याने कुठली दुष्कृती केल्याचे ऐकिवात नाही. ते नीळकंठाच्या गळ्यात जाऊन बसले. सुभाषिताची पहिली ओळ :- समुत्थितं समुद्राद् यत् मन्ये तन्न हालाहलम् ।

लोकस्तथापि अहितमाचरतीति चित्रम् ।।[२३३]

खरोखर आश्चर्य आहे की लोक तरी सुद्धा अहिताचे आचरण करतात. म्हातारपण हे एखाद्या वाघिणीसारखे भिववीत आहे. शत्रू ज्याप्रमाणे हल्ला करतात त्याप्रमाणे अनेक रोग शरीरावर हल्ला करीत आहेत. एखाद्या फुटक्या घड्यातून पाणी गळून सर्वत्र पसरावे त्याप्रमाणे आयुष्य पसरत आहे, कमी कमी होत आहे. पण ह्या सर्वांची पर्वा न करतात माणूस स्वतःचेच अहित करीत आहे. सुभाषिताच्या अगोदरच्या तीन ओळी

व्याघ्रीव तिष्ठति जरा परितर्जयन्ती
रोगाश्च शत्रवः इव प्रहर न्ति देहम् ।
आयुः परिस्तरति भिन्नघटादिवाम्भो
लोकस्तथापि.....................।।

व्याघ्री-वाघीण, परितर्जयन्ती-भिववीत आहे, जरा-म्हातारपण, परिस्तरति-पसरत आहे. भिन्नघट -फुटका माठ, अम्भ-पाणी.

शुष्कं काष्टं च मूर्खाश्च न नमन्ति कदाचन ।।[२३४]

वाळलेले लाकूड आणि मूर्ख वाकत नाहीत. केव्हाही नम्र होत नाहीत. फलभाराने वृक्ष

वाकतात म्हणजे समृद्धी आली तरी सज्जन नम्र होतात. सुभाषिताची पहिली ओळ – नमन्ति फलिनो वृक्षा नमन्ति गुणिनी जनाः । फलिनः आणि गुणिनः ही फल आणि गुण ह्या नामांना इन् प्रत्यय लागून तद्धित रुपे झाली आहेत. फलानि सञ्जातानि येषाम् इति । गुणाः सन्ति येषाम् इति ।

नकाराः षड्विधाः स्मृताः ।।२३५
न कार सहा प्रकारे दिला जातो.

पहिला प्रकार म्हणजे विचारलेल्या गोष्टी बद्दल चक्क मौन दर्शवायच. दुसरा म्हणजे विलंब लावायचा आणि शेवटी काही करायचेच नाही. तिसरा म्हणजे त्या ठिकाणाहून निघूनच जायचे. चौथा म्हणजे केवळ जमिनीकडे पाहत राहायचे. पाचवा म्हणजे जरा भुवया उडवायच्या व सहावा म्हणजे विचारणाऱ्याकडे दूर्लक्ष करुन दुसऱ्याशी बोलत राहायचे.

याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ।। २३६

एक भिकारी दुसऱ्या भिकाऱ्याला पाहून जळफळत असतो. सारांश आपला प्रतिस्पर्धी बघून माणसांच्या मनात द्वेष उत्पन्न होतो ही मनुष्य प्रवृत्ती आहे. सुभाषिताची पहिली ओळ :

दुष्ट्वा यतिर्यतिं सद्यो, वैद्यो वैद्यं नटं नटः ।

सद्यः अव्यय–ताबडतोब

चलितावित्तस्तु वित्तशेषं न रक्षति ।।२३७

एखाद्याचा पैसा जायला लागला की तो राहिलेल्या पैशांचे पण रक्षण करीत नाही.

पहिली ओळ –यथा मलिनैर्वस्त्रैर्यत्रतत्रोपविश्यते (एवं चलित....)

ज्याप्रमाणे एखाद्याचे कपडे मळाले म्हणजे इथे तिथे कुठेही बसतो व कपडे आणखी मळतील याची परवाच करीत नाही त्याप्रमाणे

यर्थकेन न हस्तेन तालिका सम्प्रपद्यते ।२३८
तथोद्यमपरित्यक्तं कर्म नोत्पादयेत्फलम् ।।

ज्याप्रमाणे एका हाताने टाळी वाजत नाही त्याप्रमाणे अर्धवट सोडलेल्या कार्याचे फळ मिळत नसते.

दुर्लभः स गुरुर्लोके शिष्यचित्तापहारकः ।।२३९

पहिली ओळ : गुरवो बहवः सन्ति शिष्यवित्तापहारकाः । असे शिक्षक पुष्कळ आहेत जे विद्यार्थ्यांकडून निव्वळ पैसे घेत राहतात पण असा शिक्षक मिळणे कठीण आहे जो विद्यार्थ्याचे मन आकर्षण करुन घेतो.

**श्री. दि. दा. औटी**
शिवकृपा, सत्संग आश्रमासमोर,
मु. पो. मुद्रे (खुर्द), ता. कर्जत
जि. रायगड ४१० २०१.
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●



## संध्येतील २४ नावे-व्युत्पत्ती व समानार्थी नामे

दि. दा. औटी

लेख २ रा

८) वामन : – ह्याचा शब्दशः अर्थ खुजा, बुटका असा आहे. मुंज झालेला ७ वर्षाचा ऋषिकुमार. अमरकोषात वामन याचे तीन ठिकाणी अर्थ दिले आहेत. दिशांचे ८ हत्ती (दिग्गज) यापैकी एक वामन आहे. दुसरा अर्थ सुरवातीस दिल्याप्रमाणे आहे व त्याला खर्वः, हास्वः असे समानार्थी शब्द दिले आहेत. तिसरा अर्थ कमी उंचीचा असा आहे. वामन हे नाम 'वामनावतार' ह्या नावाने जास्त परिचित आहे. कारण विष्णूने वामनावतार धारण करुन तीन पावले टाकली. दोन पावलातच पृथ्वीपासून ब्रह्मलोकापर्यंतचे सर्व व्यापून टाकले व तिसऱ्या पावलाने बळीला पाताळात घातले.

९) श्रीधर :– श्री म्हणजे लक्ष्मी, विभूति, संपद्, श्रीः धारयति इति श्रीधरः । विभूतिचा अर्थ मात्र अष्टमहासिद्धि. ह्या आठ आहेत. अणिमा लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, महिमा, ईशित्वं, वशित्वं व गरिमा. बलीने त्रिपाद भूमिदान करु नये असे शुक्राचार्य गुरुंनी सांगितले असताही त्याने ऐकले नाही व संकल्पासाठी तो झारीतील पाणी घेऊ लागला. शुक्राचार्यांनी आणिमासिद्धिने त्या झारीच्या तोटीत जाऊन जलमार्ग अडवला. बलीने त्या तोटीत दर्भाची काडी घातली व मार्ग मोकळा केला. कारण त्याला ईशिता व वशिता ह्या सिद्धी प्राप्त होत्या.

१०) हृषीकेश :– हृषीक (नपुं) इंद्रिय आणि ईश म्हणजे अधिपती. हृषीकाणाम् ईशः हृषीकेशः षष्ठी तत्पुरुष समास. इंद्रियांचा अधिपती.

**श्री. दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३ विठ्ठल मंदिराजवळ,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत
जि. रायगड ४१० २०१.
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

### नमः नमस्ते गिरीशाय...

हे गिरीशा तुला नमस्कार. गिरीश हे शंकराचें नांव. गिरि + ईश गिरीणां–अशः गिरीशः म्हणजे पर्वतांचा राजा. गिरां ईशः गिरीशः गिरी शब्द श्रेष्ठता, मोठेपणा, पूज्यता इत्यादि अर्थी वापरला जातो. जसे व्यंकट गिरि.

गिरी म्हणजे पर्वत. तो कृमिकीटक, सरपटणारे नागापासून अजगरापर्यंत, कोल्हयापासून सिंहापर्यंत, भिल्लांपासून तपस्वी या सर्वांना सर्वार्थांनें आश्रय देणारा. गोवर्धन पर्वतानेंच श्रीकृष्णादि गोपाळांचे रक्षण केले हे प्रसिद्ध आहे. भगवान शिव, पर्वतांप्रमाणेंच सर्वांचा आश्रयदाता, कर्ता आहे म्हणून गिरिश. प्राचीनकाळी प्रचलित असलेल्या भाषेचे व्याकरण लिहिण्याचे सामर्थ्य यावे म्हणून तपस्या करणाऱ्या पाणिनीवर प्रसन्न झालेल्या शंकरानें १४ वेळा डमरु वाजविला. त्या भिन्ननादांच्या आधारे पाणिनीने संस्कृत भाषेचे अद्वितीय व्याकरण लिहिले ते आजच्या क्षणापर्यंत अजोड आहे.

अशा रीतीने गिरी, सर्वश्रेष्ठ आणि व्यवहाराला मूलभूत असणाऱ्या शब्दांना साकार करणारा 'नाद' शिवानेंच ऐकविला म्हणूनही गिरीश. त्याला वंदन. दोन्ही व्युत्पत्तीने शिव गिरीश आहे. नमः नमस्ते गिरीशाय.

**मानवाला धर्माची आवश्यकता :**

धर्माची आज मानवाला खरोखरीच आवश्यकता आहे काय? असा प्रश्न जडवादावर विश्वास ठेवणाऱ्या निधर्मी राज्यांतील लोक वारंवार विचारत असतात. या संबंधात वाद घालताना ते जनावरांकडे बोट दाखवतात. ह्या प्राण्यांना काही विधी-निषेध असतो काहो? तसं काही दिसत नाही. कुठलही बंधन नाही. मनात आलें की काहीहि करावे. देव-दर्शन नाही, उपास-तापास नाही. काही नाही. मग आमच्याच मागे हें धर्माचे, विधि-निषेधांचे झेंगट कशाला?

**धर्म-आचार-विचार :**

धर्मामध्ये आचाराला फार महत्वाचं स्थान आहे. याचा अर्थ आचार म्हणजेच धर्म-असा जेव्हां झाला तेव्हां धर्माला विकृती आली. देव-मंदिर, उपास-तापास, भटभिक्षुकी, पळी-पंचपाी फुलं नैवेद्य आणि त्या भोवतालचं तंत्र म्हणजेच धर्म अशी धारणा जनमानसांत रुढ झाली. आपला धर्म इतका जड नाही हें लक्षांत यायला हवं. धर्म हा मनाचा एक भाव आहे. त्याच प्रकटीकरण आचारांतून व्यक्त होतं त्यामुळें धर्मभावना आणि आचार ह्या दोघांनाहि सारखंच महत्त्व आहे. विचाराशिवाय केलेल्या आचार प्रेतवत आहे आणि आचाराशिवाय केवळ विचार निष्प्रभ आहे. आचारानं विचाराचं दर्शन होतं आणि रक्षणही होतं, आणि धर्म विचारांनी आचारांना जिवंतपणा येतो. नुसता प्राण देहा शिवाय काहीहि करुं शकत नाही आणि नुसता देह प्राणाशिवाय पूर्णपणे असमर्थ असतो. जसा देह आणि प्राण यांचा संबंध असतो. त्याप्रमाणे धर्मविचार आणि आचार यांचा संबंध असला पाहिजे. आचाराच्या पालनाने त्यांतील विचारांचं पिढ्यांन् पिढ्या रक्षण होतं. ही एक जीवनाची शिस्त आहे. जीवनांतील चांगल्या विचारांचा वारसा पुढल्या पिढीला द्यायचा असेल तर तो आचारांतून दिला जातो. असो.

**धर्म-मानवी जीवन परिपूर्णतेने जगण्याचे शास्त्र:**

धर्माच्या आवश्यकतेबाबत शंका घेणारा माणूस जेव्हा आपली तुलना इतर प्राण्यांशी करु पाहतो तेव्हा त्या दोहोमध्ये साम्य कुठें आणि किती आहे व फरक कुठे आहे हें पाहणे हि उचित ठरेल. सुभाषितकारांनी यावर विचार केला आहे तो. थोडक्यात पाहूं. 'खाणे-पिणे, झोप, भिती आणि मैथून (प्रतोत्पत्ति) या चार गोष्टी पशु आणि मनुष्य यांच्या बाबतीत सारख्या आहेत. 'धर्म' किंवा 'विवेक' (सारासारविचारक्षमता) हेच मनुष्यांत विशेष आहेत जे प्राण्यांत नाहीत. त्यामुळे 'धर्महीन' किंवा विवेकहीन असा कोणीही पशुसमानच असतो.

पहाः- आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम्।

धर्मो हि तेषामधिको विशेषो धर्मेण होनाः पुशुभिः समानाः ।। किंवा

आहारनिद्राभयमैथुनानि समानमेतत्पशुभिनराणाम्।

एको विवेको ह्यधिको मनुष्ये तेनैव हीनः पशुभिः समानः ।।(-समयोचितपद्यमालिका -आ.२०)

**विवेकबुद्धिमुळे मानवाला धर्म आवश्यक :**

इतर मानवेतर प्राण्यांचे जीवन व्यवहार 'उपजत बुद्धि' (Sub Conscious)च्या साहाय्यानें सुरळीत चालतात. पण वरील सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें विवेचकबुद्धि हि मनुष्यमात्रांत 'अधिक' म्हणजे 'उपजत बुद्धि' 'विवेचकबुद्धि' (Conscious) अशी असल्याने सुरवातीलाच याची नीट दखल घेतली नाही तर उपजतबुद्धिपोटी मनांत उसळणाऱ्या उर्मी, सहजप्रवृत्ती (Instincts & Impulses) आणि विवेचक बुद्धिपोटी येणारे विचार यांचा आंतरिक संघर्ष सुरु होतो. याच विवेचक बुद्धिमुळे मनुष्याला स्वतःची जाण आहे, आत्मभान आहे. त्यामुळे एखादी गोष्ट करणं किंवा न करणं किंवा ती अन्यप्रकारें करण्याचे वर्तन स्वातंत्र्य त्याला मिळालं आहे. आंतरिक संघर्ष व वर्तन स्वातंत्र्य यातूनच त्याला निवड करायला काही प्रमाणात स्वातंत्र्य मिळालं आहे आणि जिथे निवड शक्य आहे तिथेच उपदेशाची, निधीनिषेधाची शक्यता आहे आणि आवश्यकताहि ! प्राण्यांना स्वतःविषयीची जाण नाही त्यामुळेच एखाद्या म्हशीचें एक शिंग सरळ व दुसरे वाकडे असलें तरीहि तिला त्यांचे वैषम्य वाटत नाही तर तिचा बाजार करणारा माणूस तिच्या किंमतीत थोडा फरक करतो! मांसाहारी सिंहाला आहारांत बदल म्हणून एकदांसुद्धा गवत चरावेसं वाटत नाही किंवा कुत्र्याला एकदांसुद्धा आपल्या धन्याशीं बेइमानी करावीशी वाटत नाही. या प्राण्यांना स्वतःची जाणीव नसल्याने त्यांना 'स्वार्थ' नाही, सवड नाही, स्वातंत्र्य नाहीच नाही. मनुष्याला 'स्व' ची जाणीव असल्याने त्याला स्वार्थ 'सुटला' नाही! हीन स्वार्थाच्यापोटी त्याच्या पदरांत फारसे समाधानकारक पडत नाहीच पण समाजाचें नुकसान होते. पण संतानी सांगितलेल्या निजस्वार्थाची कास धरल्यास समाजधारणा होते. व्यक्तिमत्वाचा विकास होतो. देश क्षोभरहित व समृद्ध होतो. अंतीं मनुष्याला परिपूर्ण जीवन जगल्याचा आनंद मिळतो व सान्त जीवनाचा अंत करुन तो मुक्त होतो. धर्म हे याच दृष्टीने मानवी जीवन परिपूर्ण जगण्याचे शास्त्र आहे. हा विचार नीट समजावून घेतला की धर्म म्हणजेच मानवधर्म हे लक्षांत येईल. आमच्या ऋषींनी हा मानवजातीचा सर्वांगीण विचार ऐतिहासिक दृष्टीनें इ.स. पूर्वी कमीतकमी ५००० वर्षापूर्वी केला. नव्हे, हे वैवस्वत मन्वन्तर, सातवे मन्वन्तर सुरु होण्यापूर्वीच केला होता. ''यः कल्पः स कल्पपूर्वः'' त्या पूर्वीच्या कल्पांत देखील हेच विचार होते. विचारांची वेदांची अनुस्यूत परंपरा ही अशी चालत आली आहे. ती अनादि आहे. अनन्त आहे. शाश्वत आहे. सनातन आहे. ऋषींनी वापरलेल्या 'धर्म' या शब्दानें अखिल मानवजातीची मानवता विकसित करण्याच्या नीति नियमांचा, शाश्वत जीवनमूल्यांचा बोध होत असे...मुल्याधिष्ठित जीवन म्हणजेच धर्म होय!

**सनातन धर्म :**

इथे एक गोष्ट लक्षांत घेणं आवश्यक आहे की वैदिक ऋषि सुमारें ३०० आहेत. त्यांतही १२ ऋषि फार मोठे समजले गेले आहेत. पण कोणत्याही ऋषीचे नांव या आपल्या सनातन धर्माला दिलेले नाही. याचे कारण धर्म मनुष्याने निश्चित करावयाचा नसून तो सनातन म्हणजे शाश्वत आहे, स्वयंभू आहे, स्वतःसिद्ध आहे, तो नाही म्हटले तरी नष्ट होणार नाही. तो मान्य

करुन त्याचे पालन केले तर तो मानवाचे कल्याण करील. त्याचे पालन न केल्यास मानवाचे मात्र अहित होईल.

**धर्मो रक्षति रक्षित :**

महाभारतांतील युधिष्ठिराचा यक्षाशी झालेल्या प्रश्नोत्तररुपी संवादात युधिष्ठिराने जे धर्माविषयी सांगितले त्याचे मर्म हेच आहे. तो म्हणतो,

''आपण जर धर्माचा नाश केला म्हणजे धर्माचे पालन केले नाही तर धर्मच आपला घात करतो. म्हणजे धर्म सोडल्याने आपलाच विनाश ओढवतो. पण आपण जर धर्माचें रक्षण म्हणजे पालन केले तर धर्माकडूनहि म्हणजे धर्माने आपले रक्षण केले जाते. म्हणून मी धर्म सोडणार नाही, जेणे करुन माझा घात होणार नाही.''

पहाः धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।
तस्माद्धर्म न त्यजामि मा नो धर्मो हतोऽवधीत् ।।

**धर्म व संप्रदाय, पंथ यांतील फरक :**

अशातऱ्हेंनं वसिष्ठ वामदेवांसारख्या महान द्रष्ट्यांनी आपली नावे धर्माला दिलेली नाहीत याचे कारण हा धर्म त्यांनी निर्माण केला नसून तो सनातन, शाश्वत, अटळ आहे यांची त्यांना स्पष्ट जाणीव होती. त्यानंतर पुढे इतरत्र अहंकारी पुरुष झाले व त्यांनी धर्माचे शाश्वत स्वरुप ओळखले नाही व आपापली नावे काही आचारप्रवाहाला, पंथाला किंवा उपासना मार्गाला दिलीं. ती त्यांनी दिलेली नसली तर त्यांच्या अदूरदर्शी अनुयायांनी दिली. अशी व्यक्तिगत नावे देऊनच पुढे या जगांत धर्माच्या नावाने युद्धे, कत्तली, मतभेद भांडणे सुरु झाली व अमक्याने सांगितलेला धर्म चांगला तमक्याने सांगितलेला धर्म वाईट असा अपप्रचार सुर झाला. सनातन धर्म व नंतर इतरत्र निघालेले संप्रदाय, पंथ यांतील फरक हा असा आहे.

**सनातन धर्माचे मानवजगताला आवाहन :**

भारत ही प्राचीन धर्मभूमि आहे. धर्म–तत्त्वज्ञान किबहुना सर्व शास्त्रांचा मूळस्त्रोत भारतभूमि आहे. भारतीय विद्यांच्या देशी विदेशी अभ्यासकांनी त्याचें श्रेष्ठत्व मान्य केले आहे. या अभ्यासकांपूर्वी हजारो वर्षे स्वतः मनूंनीन अखिल मानव जातीला आवाहन केले आहे. ते म्हणतात, 'या प्रदेशात, (म्हणजे भरतभूमीवर किंवा भारतांत) जन्मलेल्या श्रेष्ठ वर्णाच्या पुरुषांकडून पृथ्वीवरील सर्व मानवांनी स्वतःच्या आचारणाचें धडे घ्यावेत. पहा, ''एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः । स्वं स्वं चरित्र रिक्षेरन्पृथिव्यां सर्व मानवाः ।। (मनु. २.२०) म्हणजेच धर्मानुष्ठानाला योग्य असा प्रदेश भरतभूमी आहे असे सांगून येथे रहाणाऱ्या 'शिष्ट' लोकांनी परंपरेने आचरलेला जो धर्म तोच सदाचार होय व त्यांचे पृथ्वीवरील सर्व मानवांनी अनुकरण करावे असे मनू सांगतात.

**सनातनधर्म म्हणजेच हिन्दूधर्म :**

अशातऱ्हेने ऋषीप्रणीत वैदिक विचार आणि आचार यांचा सुरेख संयोग असलेला सनातन धर्म /वैदिक संस्कृती या भरभूमीवर हजारों वर्षे नांदली आणि तिनें अनेक वैभवाची, शांती–समृद्धींची युगं पाहिली. पण अगदी अलीकडे, काही शतकांपूर्वी पर्शियन लोक भारतांत आले

त्यावेळी त्यांनी सिंधू नदीच्या खोऱ्यांत राहणाऱ्या आमच्या पूर्वजांना आपल्या विशिष्ट उच्चारण पद्धतीनुसार 'सिंधू' ऐवजी 'हिन्दू' म्हटले. त्यांच्या पाठोपाठ आलेल्या पाश्चात्यांनी या हिंदूना पाहिलें, त्याचे आचार-विचार-संस्कृति पाहिली व ती आपली आचार-विचार-संस्कृतीपेक्षा काहिशा भिन्न तत्वांवर आधारलेली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानुसार 'हिंदू' जगत असलेला धर्म दर्शविण्यासाठी Hindu या शब्दापुढे ism हा शब्द जोडून Hinduism हा शब्द तयार केला. त्यांचे आपल्या विद्वानांनी केलेले भाषांतर म्हणजे 'हिंदूधर्म' होय. यावरुन असे दिसून येईल कीआपल्या सनातन धर्माला, चुकीचा उच्चार करुन बाहेरुन आलेल्यानी ठेवलेले व आता रुढ झालेले नाव म्हणजे 'हिन्दूधर्म' होय.

### धर्म म्हणजे 'रिलीजन' नव्हे.

आधुनिक युगांत म्हणजे पाश्चात्य संस्कृतीचा हिंदूस्थानांत प्रवेश झाल्यानंतर येथील संस्कृती व समाजरचना, पाश्चात्य संस्कृती आणि समाजरचना यांच्यापेक्षा बऱ्याचशा भिन्न तत्त्वांवर उभारली आहे हे लक्षांत आल्यावर इकडील समाजव्यवस्थेला आधारभूत आणि प्राणभूत जो धर्म, त्याच्या अभ्यासाला पाश्चात्य पंडितांनी सुरुवात केली. त्यांच्या कल्पनेला अनुसरून, 'धर्म' शब्दाने व्यक्त होणाऱ्या आचार, व्यवहार, प्रायश्चित या सारख्या व्यावहारिक आणि मोक्ष इ. परमार्थिक तत्त्वांचा समावेश त्यांनी सुचविलेल्या प्रतिशब्दाने दर्शविला जाईल असे गृहीत धरुन त्यांनी Law, Duty, Sacred Law, Religion वगैरे शब्दांनी धर्म शब्दाची भाषान्तरे केली. हिंदूनी वापरलेला 'धर्म' शब्द आणि आपण त्याची केलेली भाषान्तरे, यांची व्याप्ति सारखीच आहे किंवा नाही, त्यामध्ये अर्थैक्य किंवा अर्थसाधर्म्य आहे किंवा नाही हे तपासून पाहण्याची जबाबदारी त्या भाषान्तरकारांवर पडत नसून खरोखर ती हिंदू पंडितांवर येऊन पडते. पण दुर्दैवाने मागील ४ पिढ्यांतील सुशिक्षित हिंदू पंडितांनी ते कार्य तर केले नाहीच, उलट त्या पाश्चात्य पंडितांचे भारवाहक बनून त्यांची मतेंच इकडे-तिकडे पसरविण्याचे कार्य केले. त्यामुळे हिंदूधर्म हा इतर म्हणजे बुद्ध, ख्रिस्त, मुसलमान, जैन, यहुदी इ. जे व्यक्तीपासून सुरु झालेले पंथ किंवा संप्रदाय धर्म आहेत तसाच एक वैयक्तिक उपासनेचा मार्ग आहे असा भ्रम निर्माण झाला आहे व त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आणि त्यातूनच हिंदूधर्म हा मानवधर्म आहे हे परत एकदा सांगण्याची वेळ आली आहे.

### उदारहिन्दूधर्माचा सर्व-धर्म-समभाव :

जगांत हिंदूधर्मच असा आहे की त्याच्यामागें व्यक्तीचे नांव नाही. बाकीचे धर्म व्यक्तीच्या नावाने चाललेले आहेत आणि म्हणून ते मतभेद वाढवित आहेत. 'माझ्या धर्मांत ये, त्याच्या धर्मांत जाऊ नकोस' असे हे सर्व अन्य धर्म म्हणतात. केवळ हिंदूधर्मच असा आहे की जो मानवधर्म पाळा असे आजही तळामळीने सांगत आहे. अन्य मत मतान्तराची निन्दा न करता केवळ मानवतेच्या विकासासाठी हिंदूधर्मच प्रयत्न करीत आहे. नीट लक्षांत असू द्या कीं, सर्व धर्मामध्ये जेवढा भाग खरा आहे त्याचें पालन केल्याने मानवांचे कल्याणच होईल असे उदारपणाने एकटा हिन्दूधर्मच म्हणत आहे. ही हिंदूधर्माची आजची विचारसारणी वैदिक ऋषींच्या

मूल सनातन धर्माविषयीच्या विचारसरणीशी जवळची आहे...ऋषी म्हणतात. 'ईश्वराची ही स्फूर्ति आहे. ती मला आज स्फुरली. जशी ती मला स्फुरली, तशी ती मी प्रकट केली आहे. ही स्फूर्ति माझी नव्हे. ती सर्वव्यापक परब्रह्मरुपी महाशक्तीची स्फूर्ति आहे. या स्फूर्तीमध्ये माझा अहंकार मी ओतलेला नाही. इतर शुद्ध अंतःकरणातूनहि अशी स्फूर्ति होणे शक्य आहे. नव्हे, वेळोवेळी अशीच स्फूर्ति सत्पुरुषांना, सन्तांना होत आली आहे. यासर्व स्फूर्तीचा उगम त्या पूर्ण परब्रह्मरूपी महाशक्तीमध्ये आहे त्या महाशक्तीमुळेच आम्ही येथे आहोत. त्यामुळेच आमचे पालन होत आहे. व शेवटी त्यामध्ये आम्ही विलीन होणार तोच आनंदाचा कंद आहे. तोच सर्वांचा आश्रय आहे. तोच सर्वांचा आदि मध्य व अन्त आहे. सर्व विश्व हे त्याचेच प्रत्यक्ष रुप आहे. तोच सत्य स्फूर्ति देणारा आहे'...ही जी ऋषींची विचारसरणी आहे ती किती खरी, योग्य व ईर्ष्या-द्वेष कमी करणारी आणि म्हणून उदार मानवतावादी आहें. हे स्पष्ट व्हावें. या दिव्य विचारसारणीच्या संदर्भात सध्या जगांतील ४-५ धर्म प्रसृत करीत असलेली विचारसारणी पहा म्हणजे आणखी सुस्पष्ट होईल. 'लोकहो ! मी ईश्वराचा प्रेषित आहे. तुम्ही माझेच ऐका. मी तुमचे तारण करीन. तुम्ही माझ्या मागे या. जे माझ्या मागे येतील व मजवर विश्वास ठेवतील त्यांचे तारण करण्याची शिफारस मी ईश्वरापाशी करीन. इतर धर्म तुमचे तारण करणार नाहीत. माझा धर्मच तुमचें तारण करील. माझ्यावर विश्वास ठेवा. इ. असो. हिंदूधर्म म्हणजे मूळचा सनातन धर्म व सनातन धर्म म्हणजे मानवधर्म हे वरील विवेचनावरुन स्पष्ट व्हावे.

**सनातन तथा हिंदू धर्माची स्वरुप-व्याप्तिः**

अखिल मानवजातीची अगदी अद्ययावत् शास्त्राला धरुन कोणतीहि विभागणी मान्य केल्यास त्यामध्ये कुठलाही भेद निर्माण न करता त्यांची व्यवस्था आपल्या धर्मांत आहे हे आतां थोडक्यांत पहायचे आहे. हिंदूंच्या धर्म संकल्पनेमध्ये काय काय सामावले आहे पहा... धर्म म्हणजे...

**१. व्यक्त-अव्यक्त धर्म** : यांत विग्रहवान व्यक्ति किंवा प्रतीकरुप धर्मस्वरुप व्यक्त होते. जसे रामोविग्रहवान धर्मः । श्रीराम, श्रीकृष्ण यांच्या आचारांतून व शिकवणीतून धर्माचे स्वरुप व्यक्त होते. भागवतामध्ये वृषभरुपी धर्म कलियुगांत एका पायवर लंगडत चालल्याची कल्पना आहे. 'धर्म' या शब्दान अव्यक्त तत्त्वस्वरुपाचाहि बोध होतो.

**२. स्वधर्म** : धर्माकडे दुसऱ्या दृष्टीने पाहिल्यास त्यांत व्यक्तीचं नियंत्रण करणाऱ्या स्वधर्माचाहि बोध होतो.

**३. कुलधर्म** : व्यक्तिसमुच्चयात्मक किंवा कुटुंबपद्धतीने राहणाऱ्यांसाठी कुटुंबाचा विकास-वृद्धि व्हावी म्हणून असणाऱ्या कुळधर्माचाहि विचार धर्मशास्त्रांत केलेला आहे.

**४. आश्रमधर्म** : व्यक्तीच्या आयुष्यांत होणाऱ्या वाढीला अनुरुप असे नियम लावून देणाऱ्या आश्रम धर्माचाही समावेश धर्मात होतो.

**५. जातिधर्म** : वंशपद्धति स्थिर ठेवणारे जातिधर्म यामध्ये येतात.

**६. वर्णधर्म** : संस्कृतीचा उत्कर्ष साधणाऱ्या वर्णधर्माचा अंतर्भाव धर्मात होतो.

**७. प्रवृत्तधर्म–निवृत्तिधर्म:** वरील सर्व धर्मांत मानसशास्त्रीय व समाजशास्त्रीय तत्त्वांचा समावेश होतो हे स्पष्ट आहे. माणसांची निव्वळ मानसशास्त्रीय विभागणी मान्य केल्यास मानवी प्रकृतीला धरुन होणारे प्रवृत्तिधर्म व निवृत्तिधर्म हे हि धर्म संकल्पनेत समाविष्ट आहेत.

८. **नीति आणि सद्‌गुण** यांनी युक्त अशी क्रिया म्हणजे धर्म असाहि अर्थ होतो.

९. **कार्यकारणभाव** : अभेद्य अशी कार्य कारणरुप प्रणाली किंवा ज्याला पर्यायाने ईश्वरी न्याय म्हणता येईल अशातऱ्हेची व्यवस्था, असाहि अर्थ 'धर्म' शब्दांत अभिप्रेत आहे. येथे कर्म केल्यास कर्मफल मिळालेच पाहिजे. कर्मफलापासून सुटका नाही असा बोध होतो.

१०. ज्या क्रियेने **परमेश्वराच्या ठिकाणी भक्ति** निर्माण होते ती क्रिया म्हणजे धर्म असेहि मानले जाते.

११. धर्म शब्दाने **सुकृति अथवा पुण्य पावनकर्म** असाहि अर्थ होतो. पाप–पुण्य, सुकृति–दुष्कृति ह्या माणसाचा आणि समाजाचा उत्कर्ष किंवा अपकर्ष करणाऱ्या क्रिया धर्म शब्दाने सूचित होतात. थोडक्यांत धर्म म्हणजे सद्‌गुण, नीती, सत्कर्म, पुण्य, मनुष्यप्राण्याचें ऐहिक आणि पारमार्थिक ध्येय, मानवसमाजाचे धारण–पोषण करण्याचा राजसत्ता, प्रत्यक्षांतून मनुष्याला ध्येयस्वरुपापर्यंत नेणारा मार्ग, सदाचार, कायदा फार काय सांगावें धर्म म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचे स्वरुप.. या सर्व अर्थानी हिंदूंच्या धार्मिक वाङ्‌मयांत 'धर्म' शब्दाचा अर्थ केलेला आढळतो.

१२. हिंदूधर्म म्हणजे मानवधर्म हे सर्वार्थिनें स्पष्ट करणारा शेवटचा पण अत्यंत महत्त्वाचा विचार म्हणजे योगशास्त्र विचार. मनुष्यमात्राला ज्या माध्यमांतून जीवनाचा, जगाचा अनुभव येतो तें मन व बुद्धि किंवा भावना आणि विचार यांच्या विकासाची स्थिति व एकमेकांवरील त्यांचे वर्चस्व यांच्यावर आधारित सर्व म्हणजे चारही प्रकारच्या शक्यता आमच्या ऋषींनी नीटपणे लक्षात घेतल्या व त्या चारही प्रकारच्या माणसांची चिकित्सा करुन चार योगांचा उपचार दिला. त्या चार प्रकारच्या लोकांमधील **पहिला प्रकार 'विचारवन्तांचा'**. या प्रकारांतील लोकांत मनावर बुद्धीचे वर्चस्व असते किंवा भावनांवर, उर्मींवर विचारांचे नियंत्रण असतं. **दुसरा प्रकार भावनाप्रधान लोकांचा** दैनंदिन व्यवहारांत ह्यांच्या प्रतिसादाला वैचारिक प्रखरतेऐवजी भावनांचा ओलावा असतो. **तिसरा प्रकार संमिश्र व्यक्तिमत्वाचा.** या प्रकारांतील लोक कधी भावनाशील तर कधी विचारी अशा दोलायमान स्थितींत वावरतात. **चौथा प्रकार अविकसितांचा** ज्यांच्यामध्यें मन किंवा बुद्धि यांचा पुरेसा विकास न झाल्यामुळे विचारांचे आघात किंवा भावनांचा स्पर्श या प्रकारांतील व्यक्तींना अभावानेच होतो. एकंदर **माणसांमध्ये भावनाप्रधान माणसे व संमिश्र व्यक्तिमत्वाचीं माणसे बहुसंख्येने असतात.** अर्थात अशा बहुसंख्य माणसांच्या सहजप्रवृत्ती लक्षांत घेऊन **भावनाप्रधानांसाठी भक्तिमार्ग व संमिश्रवृत्तीच्या माणसांसाठी कर्ममार्ग** याचा उपचार जवळ जवळ सर्वच धर्म देतात. पण इतिहासावरुन असे लक्षांत येते की **'विचारवन्त'** आणि **'अविकसित'** या दोन्ही अल्पसंख्यांकांवर भारताबाहेर धर्माच्या

अधिपत्याखालील शासनाने अन्याय केला. येशुला सुळावर बळी जावे लागले. सॉक्रेटिसला विषाचा प्याला दिला गेला. **'अविकसित'** लोकांना एक तर गुलाम म्हणून जिंकून राबविण्यांत आलं नाहीतर त्यांना निःसंतान करुन हाकलून देण्यांत आलं. म्हणून हिंदूधर्माने जगांत ज्यांच्यावर साधारणपणे अन्याय होतो अशा **विचारवन्तांना 'ज्ञानयोग'** व **अविकसितांना' 'हठयोग' देऊन,** अखिल मानवजातीमधील या अल्पसंख्यांकांना न्याय देऊन, सर्वांगीण विकासांतील जीवनयात्रेंत सामाऊन घेतलं आणि अखिल मानवजातीचे गुरुस्थान आपल्या कर्तृत्वाने मिळवलं. या दृष्टीने चतुर्विध मानवजातीला चतुर्विध योगांचं पयसदान देऊन सर्वांना पायरीपायरीनें अमृतत्वाकडे घेऊन जाणारा हिंदूधर्म म्हणजे सर्वार्थाने मानवधर्म म्हणवून घ्यायला सुपात्र आहे हे स्पष्ट होते. असो.

**समारोप–सद्यस्थिति–सत्पुरुष व संघटना आवश्यक :**

हे सर्व सत्य असूनही आज हिंदूधर्माच्या सद्यस्थितीकडे किंवा दुःस्थितीकडे दुर्लक्ष करता येत नाही. एकेकाळी शाखोपशाखांनी बहरलेला, सर्व श्रान्त पांथस्थांना आश्रय, विश्रान्ति देऊन, त्यांच व्यक्तिमत्व फुलाप्रमाणे उमलवून, त्यांना मार्गस्थ करवून, अंती अमृतत्वांचे फळ देणारा सनातन तथा हिंदू धर्माचा वृक्ष आज रोडावलेला दिसत आहे. त्यामध्ये अनेक अवैदिक विचार शिरल्यामुळे तो थोडासा हिणसक वाटत आहे. ऐश्वर्याची, समृद्धिची सर्व पानें फुले गळून झडून गेली आहेत. अंधश्रद्धा, गैरसमजूती, अपसमज यांची असंख्य बांडगूळे फांद्यांवर दिसत आहेत.. या बांडगुळानांच धर्म समजून, योग्य मार्गदर्शनाच्या अभावी अंधश्रद्ध लोक बिलगून राहिले आहेत...आणि अश्रद्ध लोक त्या बांडगूळाचे निमित्त करुन मूळ धर्मवृक्षाचाच उच्छेद करण्यास सिद्ध झाले आहेत.. परिणामी समाजाची घडी बिघडलेली आहे.. एखाद्या कुशल माळ्याप्रमाणे, बागायतदाराप्रमाणें, सश्रद्ध, सुशिक्षित व धर्मप्रेमी लोकांच्या हे लक्षांत यायला हवं की झाडावर असलेलं बांडगूळ–झाड अजूनहि जिवंत असल्याची ग्वाही देत आहे. याचे पुनरुज्जीवन शक्य आहे. त्यासाठी धर्मशास्त्राचं अध्ययन आणि प्रामाणिक शोध व समज यांचे खत–पाणी घालून बहुजन हिताय बहुजनसुखाय यासाठी आपल्या सनातन धर्म व भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन–धर्मवृक्षाची योग्य मशागत करणं–आपल्यासारख्या सर्व सुजनांचं पवित्र कर्तव्य असून त्यासाठी आजच्या काळाला उचित असा धर्म सांगणाऱ्या अधिकारी सत्पुरुषांची व त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे सत्कार्य करणाऱ्या संघटीत संस्थांची आवश्यकता आहे. देव करो आणि तसेच होवो!


**शं. र. तथा प्रकाश पराष्टेकर**

'चिन्मय सदन', ए–२२, साई ओम
ए व बी सहकारी गृहनिर्माण
संस्था मर्यादित, शहीद मंगल पांडे मार्ग,
ठाणे (पश्चिम)–४०० ६०४.
दूरध्वनी : (०२२) २५८० ५९४४
मोबाईल : ९९८७५८६७४६
ई–मेल :srparashtekar@gmail.com


●●●

# ऋग्वेदातील ख्यातंनाम स्त्रिया

(संपादित)

श्री. शं. बा . मठ

**ऋचिकांची नांवे (मंडळ, सूक्त, ऋचा सह)**

अदिति (४.१८.७), अपाला (८.९१.७), इंद्राणी (१०.८६), उर्वशी (१०.९५.२), कमद्युगोधा (१०.१३४), घोषा-१०.३९ , ममता मुद्‌गलानी १०-१०२-२, मेना यमी १०.१० रजि रोमाशा १.१२६.७, लोपामुद्रा (१.१७९.१), वध्रिमती वसुकपत्नी (१०.२८), विश्पला विश्ववारा (५.२८), सरमा (१०.१०८.४२), सार्पराज्ञी (१०.१८९), शश्वति (८.१), सरण्यू (१०.१७.२), सुदेवी, सूर्या (१०.८५) या सर्वांचा उल्लेख बृहद्देवतेत आढळतो (बृहद्देवता नावाचा ग्रंथ आहे.)

घोषा गोधा विश्ववारा अपालोपनिषत् निषत्
ब्रह्मजाया जहुर्नाम अगस्त्यस्य स्वसाऽदितिः ।[८२]
इंद्राणी चेन्द्र माताच सरमा रोमशोर्वसी
लोपामुद्रा च नद्यश्च यमी मारीच शश्वती । [८३]
रात्री सूर्या च सावित्री ब्रह्मवादिन्य ईरिताः ।
श्रीर्लाक्ष सार्प राज्ञी वाक्श्रद्धा मेधाच दक्षिणा ।[८४]

**अपाला**

ही मोठी विदुषी स्त्री, अत्रि ऋषीची कन्या लग्न झाल्यावर अंगावर कुष्ठरोग झाला म्हणून नवऱ्याने तिला टाकली. ती पित्याकडे येऊन राहिली. ती तापस वृत्तीने राहू लागली. तिला कळले की इंद्राला सोम फार आवडतो. त्याला सोमरस अर्पण करण्याची तिला इच्छा झाली. ती सोमाच्या शोधार्थ घराबाहेर पडली.

तिला एक नदी आढळली. दिवस वर चढल्यामुळे तिने तिथे स्नान केले. स्नान करुन तीरावर सोम शोधीत निघाली. सुदैवाने तिला सोम मिळाला तो घेऊन ती घराकडे निघाली.

हा सोम कसा लागतो त्याची चव पाहावी म्हणून थोडासा सोम तोंडात टाकला व खात घराकडे निघाली. दाताखाली सोम चिरडला जात असता आवाज होई. इंद्राला वाटले इथे कोणी तरी सोम दगडाने कुटीत आहे म्हणून तो तेथे आला. अपालाकडे पाहून म्हणाला इथे दगडाने सोमकुटणे चालू आहे. अपाला म्हणाली-कोणी सोम कुटीत नाही मी दातात धरुन चावून सोमाची चव कशी लागते हे पहात आहे. मी घरी गेल्यानंतर हा सोम कुटून इंद्राला अर्पण करणार आहे. आपण कोण? तो म्हणाला मी इंद्र आहे. अपालाला आश्चर्य वाटले. देवा बरे झाले, आपण मजबरोबर घरी चलावे. सोमाबरोबर लाह्या देते. चला ना, नाही म्हणू नका.

तिची भक्ती पाहून इंद्र संतोषला. ती इतक्यात म्हणाली घरी कशाला माझ्या दातांनी शुद्ध सोमरस काढून देते तो घ्या व तुष्ट व्हा. तिने सोम चावून रस काढला व तो इंद्राला दिला. भक्तीने तो रस इंद्राने प्राशन केला. इंद्र संतुष्ट झाला, मी तुझे कोणते प्रिय करु. ती चतुर स्त्री त्याला म्हणाली-माझ्या बापाचे टक्कल नाहीसे व्हावे, आणखी माझ्या वडिलाची जमीन नापीक आहे ती सुपीक व्हावी. शेवटी म्हणाली, माझ्या पोटाच्या खालचा भाग रोमयुक्त व्हावा. माझ्या

उदरी संतान नाही मला मूल व्हावे. पतीला मी प्रिय व्हावे. तथास्तु

परंतु कुष्ठ झाल्याने नवऱ्याने तिला टाकले होते. तिचा कुष्ठरोग घालवण्यासाठी रथाच्या तुंब्यानी तिचे शरीर तीन वार घासून निर्दोष केले. तिची शरीर कांती सूर्याप्रमाणे तेजस्वी केली. (शाटयायन ब्राह्मण ८.९१ १ ते ७)

खे रथस्य खे अनसः खे युगस्य शतक्रतो।
अपालामिन्द्र त्रिपात् व्यंकृण्वो सूर्य त्वचम् ।७

साधारण शबरीच्या कथेसारखी ही कथा वाटते. त्या आपुल्या चावोनि शुद्ध दाते। चोखो नि घे मी शिवते पदाते। हि कथा बृहदेवतेतही आली आहे. ६/९९/१०६१

**उर्वशी**

गंधर्व लोकातील एक प्रख्यात अप्सरा. ती सुंदर होती. ती मृत्यु लोकी आली असता राजा पुरुरवा तिच्या दृष्टीस पडला. तो सुंदर असल्यामुळे ती त्याच्यावर भाळली. ती कामवश झाली. तीन अटीवर तिने त्याच्याजवळ राहण्याचे मान्य केले. १) दिवसातून तीनच वेळा आलिंगावयाचे. २) तिच्या संमतीशिवाय तिच्याजवळ निजावयाचे नाही. ३) एकांताखेरीज त्याचे नग्न रुपात दर्शन घडू नये. यापैकी कोणतीही अट मोडल्यास ती निघून जाईल. राजाने अटी मान्य केल्या.

ती तिथे रंगून गेली. गंधर्व लोकाचा तिला विसर पडला. गंधर्वानी शोध घेतला. ती पृथ्वीवर पुरुरव्याजवळ असल्याचे कळले. तिला मूल बाळ नव्हते. स्वतःची हौस पुरविण्यासाठी दोन गोजिरवाणी कोकरे बाळगली होती. ती कोकरे तिचे जीव की प्राण.

एके रात्री कोणीतरी कोकरे पळवून नेली. कोकरे ओरडू लागली. ती जागी झाली. तिने आरडा ओरड केला. पलीकडल्या खोलीत पुरूरवा झोपला होता. तो जागा झाला. गलका आरडा ओरडा कशा बद्दल चालला आहे हे पहाण्यासाठी बाहेर धावला. त्यावेळी तो नग्न होता. कपडे करावयाचे विसरुन उर्वशीजवळ येऊन चौकशी करु लागला. गंधर्वानीच कोकरे पळविली होती. पुरुरवा नग्न असून उर्वशीजवळ आला आहे हे पाहताच गंधर्वानी त्याजवर प्रकाश पाडला. उर्वशीने त्याला नग्नावस्थेत पाहिले. करार मोडला म्हणून ती स्वतंत्र झाली व तेथून चालती झाली. राजा उर्वशी, उर्वशी करत धावत गेला. तिचा शोध घेतला ती कुठे आढळली नाही.

तो राजा वनात भटकू लागला. त्याला तिचे वेड लागले. असा भटकत असता एकदा एका तळ्याच्या काठी अप्सरेंच्या घोळक्यात उर्वशी अकस्मात दिसली. तिला पाहताच तिला तो मिठी मारावयास गेला तशी ती उसळली आणि म्हणाली-पुरुरव्या मी तुझी कोणी नाही. जा घरी जा. सुखात रहा. असा वेड्यासारखा फिरु नकोस. तो तिला म्हणाला-उर्वशी तू माझा प्राण. तुला सोडून कुठे जाऊ. तू इतकी दुष्ट का झालीस. ती म्हणाली-वेडा रे वेडा तू स्त्रियांच्या सख्याला खरे सख्य मानतोस हे योग्य नव्हे (न वै स्त्रैणानि सख्यानि.१०.२५.१५) तू बावळट आहेस. आमचे हृदय म्हणजे लांडगीचे हृदय होय. (सालवृकाणां हृदयान्येता) अजून तुला कसे कळत नाही. माझी आशा सोड, पुढील उद्योगास लाग.

शेवटी तिला त्याची दया आली. तिने तिला मिळविण्याचा मार्ग सांगितला. उद्या गंधर्व येथे येतील त्याना सांग उर्वशी जवळ मला राहावयाचे आहे. ते सांगतील तसे कर. तुझी इच्छा सफल होईल.

दुसऱ्या दिवशी गंधर्व आले. पुरुरव्याने इच्छा व्यक्त केली. ते म्हणाले या देहाने गंधर्व लोकी तुला राहता येणार नाही, हा अग्नि घे व त्यात हवन कर. तुला आमच्यातला एक होता येईल. उर्वशीपासून पुरुरव्याला एक मुलगा झाला तोच ययाति होय. (शतपथब्राह्मण ११.५.१)

### घोषा

घोषा ही कक्षिवानाची मुलगी. दुर्दैवाने ती कुष्टरोगी होती. तिच्याशी कोणीही लग्नास तयार होईना. तिचे तारुण्य उलटून गेले. तिला संन्यस्त जीवनाचा त्रास होऊ लागला. तिला एक आशेचा किरण दिसला. अश्वींचा धावा. आपल्या पित्याला ह्याने तरुण केले होते हे तिला आठवले म्हणून त्यांची उपासना केल्यास अश्वींची आपल्याला मदत होईल असे तिला वाटले. त्याप्रमाणे तिने उपासना केली. अश्वी प्रसन्न झाले. ती त्याना म्हणाली हे अश्वीहो या घोषेला पति प्राप्त होतो. त्यासाठी तिचा जरठपणा जाऊन तारुण्य प्राप्त होवो (अस्मा अम्हे भवति तत् पतित्व नम्। १०.४०.९) मी तुमच्या कृपेने प्रपंच सुखाची इच्छा करते (युवो रह मनसा सुम्न मा चके (१०.४०.७) न तस्य विभ मयः पतिभ्यो जनयः परिष्वजे (१०.४०.१०) स्त्रिया पतीला अलिंगन देऊन सुख देतात. हे मला माहित नाही. ते तुम्ही मला समजाऊन सांगा (तदुषं प्रवोचत्) मी तरुण पुरुष पती असलेल्या पति गृही जाऊ इच्छिते. ते घर मला मिळवून द्या. (प्रमो स्त्रियस्य वृषभस्य रेतिनो गृहे ममे माश्विना तदु श्यसी (१०.४०.११) मी पतीला प्रिय होईन असे करा (प्रिया अर्मणो दुर्या अशीमही) ही घोषेची प्रार्थना ऐका. तिने काकुळतीने प्रार्थना केली. म्हातारी होत चाललेल्या घोषेला तारुण्य देऊन तिच्या मना जोगता पति मिळवून दिला. तिला सुहस्ति नावाचा भुवितुल्य पुत्र झाला. (घोषायै चित् पितृपदे दुराणे पतिंजुर्यन्त्या अश्विना वदत्तम्। (१.११७.२०)

आतस्थे महतीं चिंतां न पुत्रो न पति र्मम।
जरा प्राप्ता मुधा तस्मात् प्रपद्योहं शुभस्वती
स्तुतौ तौ अश्विनौ देवौ प्रीतौ तस्या भगन्तरम्।
भर्तारं ददतुः तस्यै सुहस्त्यं च सुतं मुनिम्।
ब्रह्मदेवता ७.४२ ते ४७

### मुद्‌गलानी

भर्म्यश्वाचा पुत्र मुद्‌गल याची ही बायको. नळराजाची मुलगी, माहेरचे नाव इंद्रसेना (मुद्‌गलानी गविष्ठौ भारे कृतं व्यचेदिन्द्रसेना ऋ.१०.१०२.२) हिला बालामती असेही म्हणतात. ही मोठी शूर व सारथ्य कर्मात चतुर होती. नळराजाकडून सारथ्य विद्या तिला मिळाली होती. मुद्‌गल गोधनाने संपन्न होता. चोरांची या धनावर नजर होती. त्यानी गोधन लुटून नेले. ही बातमी मुद्‌गलास कळताच तो पाठलाग करण्यासाठी सिद्ध झाला. रथास जुंपण्यासाठी काही साधन नव्हते. सर्व पशु पळवून नेले होते. एक म्हातारा बैल मात्र चोराने नेला नव्हता. एका बाजूस त्याला जुंपला दुसऱ्या बाजूस काही मिळेना एक मुद्‌गर जोडला व चोराच्या पारिपत्यास निघाला. मुद्‌गलानी इने सारथ्य केले. बैलाला जोरात पळविले. चोराना गाठून गाई मिळवल्या.

शत्रूशी दोन हात करुन त्या मुक्त पशुधनाना परत घेऊन आली.

**यमी**

त्वष्टयाला त्रिशिरस हा मुलगा व सरण्यू ही मुलगी अशी दोन अपत्ये होती. सरण्यू उपवर झाली. तिला विवस्वानास दिली. तिला यम आणि यमी अशी जुळी भावंडे झाली. ती एकत्रच वाढली.

यमी वयात आली आणि तिच्या मनात पुरुष सुखेच्छा उत्पन्न झाली ती भावना विवश होऊन आपल्या भावाजवळ येऊन रतिसुख देण्याबद्दल विनवू लागली. तो त्यांचा संवाद ऋग्वेद १०.१० मध्ये आहे.

यमी – यमा हे स्थल किती एकांत व प्रशांत आहे. प्रसन्नपण आहे.

यम–होय खरे आहे.

यमी–या प्रसन्न एकांत स्थळी माझ्या प्रिय सख्याला अति सुखासाठी विनविले तर अयोग्य होईल काय? यमा मला उत्तम मुलगा व्हावा म्हणून माझ्याशी संग करुन तू पितृपद मिळव. तू माझा प्रेम सखा हो.

यम– यमे, हे तू काय बोलतेस, कुणाला बोलतेस मी तुझा भाऊ आहे. मी प्रेम करतो, परंतू तू म्हणतेस तशा तऱ्हेची मैत्री मी तुझ्याशी करु इच्छित नाही. आपले समान नाते आहे. ते विषम करण्याची माझी इच्छा नाही. देव द्यावापृथ्वीला धारण करतात व सर्वत्र पाहात असतात. देवाचे भय तुला वाटत नाही काय?

यमी– तुला कळत कसे नाही. देव झाले म्हणून काय झाले. ते मनुष्याला लाज वाटणारी गोष्ट करतात की नाही? प्रजापतीने काय केले? म्हणून म्हणते तुझे मन माझ्याशी समरस होऊ दे आणि त्या प्रजापतीप्रमाणे तू माझ्या शरीरात प्रवेश कर.

यम– जे मागे झाले ते होऊन गेले. ते पुनः होणे नाही. आतापर्यंत पाप पुण्याचा ऐसपैस गोष्टी बोलणारे आर्य आम्ही असल्या हीन पापांच्या गोष्टी कशा बोलाव्या? आकाशातील सूर्य, आमचे पोषण करणारी पृथ्वी (सरण्यू) हे आमचे आईबाप नव्हेत काय? आमचे भावाबहिणीचे नाते आहे तू कशी विसरतेस?

यमी– तू बावळट आहेस अरे त्वष्ट्याने आम्हाला गर्भात असताना नवरा बायको केले आहे. त्याची इच्छा कोण मोडू शकेल, हे नाते सरण्यू व सूर्य (माता पिता) जाणतात. शिवाय असा आपला संबंध कोणाला कळणार आहे आणि बाहेर तरी कोण फोडणार. मित्रावरुणाच्या जगात नसत्या पापाच्या भडक कल्पनेने बहकलेल्या यमा काय बोलतोस. माझे अंतरंग कसे सांगू. तुजजवळ निजण्याचा काम बलवत्तर झाला आहे. तो मला छळत आहे. पत्नी आपले शरीर पतीच्या स्वाधीन करते त्याचप्रमाणे मी माझे काम तप्त शरीर तुझ्या स्वाधीन करु इच्छिते. तर आता रथ व चाक याप्रमाणे एकमेकास आलिंगन देऊ या.

यम – यमे तू प्रेमांध झाली आहेस. देवदूत हे सर्वत्र फिरत असतात. ते कोठे थांबत नाहीत व कोठे डोळे झाक, करत नाहीत म्हणून म्हणतो तू येथून आता नीघ आणि दुसऱ्या कोणा पुरुषाकडे जा. त्याला यथेच्छ कडकडून भेट जा. येथून नीघ.

यमी – यमा अहोरात्र तुला सद्बुद्धी देवोत आणि

द्यावापृथ्वी या यमीला यमाची बायको करोत.

यम-बहिण भावाला सोडून इतराना पती करुन घेणेचा आता काळ येत आहे. तेव्हा हे सुभगे मला आता सोडून जा. आणि दुसऱ्या पुरुषाची इच्छा कर. त्याचा बाहू तू उशाशी घे.

यमी-तुझ्यासारखा सुंदर तरुण भाऊ असूनही मी जर बहिण अनाथ होईन तर मग तू माझा भाऊ कसला? यमा माझा भाऊ आणि माझ्यासारखी सुंदर तरुण बहीण जवळ असूनही तू जर कष्टी होशील तर मग मी बहीण तरी कसली? काम विकाराने संतप्त होऊन हे मी काही तरी बरळू लागले आहे. तर यमा माझा अंत तू पाहू नकोस तू आपले शरीर माझ्या शरीराशी भिडव आणि मला सुखी कर.

यम-नाही मी तुझ्याशी संग व रत होणार नाही. यमे बिलकूल नाही. जो बहिणीशी प्रेमरत होतो तो महापापी आहे. तर सुभगे तू येथून जा. मला सोडून दुसऱ्या पुरुषाची इच्छा कर. तुझा भाऊ हे पाप मुळीच करु इच्छित नाही.

यमी- यमा किती निष्ठुर आहेस रे तू. तुझे मन तरी कसे कठोर होते कोण जाणे. तू इतका पाषाण हृदयी असशील हे मला माहीत नव्हते. पण हाय आता काय मला वाटते कोणीतरी दुसरी रमणी वेलीप्रमाणे वेष्टून असेल.

यम-तुही लता जशी वृक्षाला आलिंगून असते त्याप्रमाणे दुसऱ्या एखाद्या पुरुषाला आलिंगून रहा. तीही तुला तशीच मिठी मारो. तू त्याचे मन आकर्षून घे. तो तुझे घेवो, याप्रमाणे तू पती बरोबर सुखाने संसार कर. जा यमे तू एथून निघून जा. (वंश प्रजापति मरीचि कश्यप त्वष्टा-त्रिशिरस व विवस्नान् शरण्यू, यम यमी जुळी भावंडे)

अभवत् मिथुन त्व ष्टुः सरण्यु स्त्रिशिरा सह ।
स वै शरण्युं प्रायच्छत् स्वयमेव विवस्वति ।
ततः सरण्यां जज्ञाते यमयमी विवस्वतः ।
तौ च अपि उभौ यमौ एव जायां स्ताभ्यां तु वै यमः ।

**विश्पला**

ही महा विदुषी होती. ती मोठी शूर होती. ती खेल राजाची बायको. एकदा राजावर लढाईचा प्रसंग आला. ती त्याच्याबरोबर लढाईत गेली. रणात शौर्याने लढली अकस्मात् शत्रूनी तिला घेरले. तिचा पाय तोडून टाकला.

तिने अश्विनींचा धावा केला. ते तिच्या जवळ आले. तिच्या विनंतीवरुन तसाच दुसऱ्या लोखंडाचा पाय करुन तो त्यानी मोठ्या कौशल्याने त्या तुटलेल्या पायाच्या जागी जसाचा तसा बसवून दिला. ''चरित्रं हि वेरिवाच्छे दि पर्ण माजा खेलस्य परितक्यायाम्! । सद्यो जंङघं आयसीं बिश्पलायै श्वने हिते सर्तवे प्रत्यधत्तम् ।'' (ऋक १.११६.१५). तुटलेला पाय बरोबर झाल्यावर दुसऱ्या दिवशी ती शूर महिला पुनः शत्रूबरोबर लढावयास गेली व शत्रूवर जय मिळविला.

याभिः विश्पलां धन सामथर्व्यं सहस्त्रमीळह आजा व जिन्वताम् । (१.११२.१०)

ही महिला पतीबरोबर जाऊन तेथे शौर्याने लढली व शत्रूला धूळ चारुन ऋग्वेदात प्रतिष्ठा मिळविली व अमर झाली. विश्पलाचे अनुकरण कैकयीने केले ती दशरथाबरोबर युद्धात गेली व त्याला मदत केली हा रामायण कालीन इतिहास आहे.

### सरण्यू

त्वष्ट्याची मुलगी यम व यमीची आई. मुलांच्या जन्मानंतर तिला जावेसे वाटले. एका स्त्रीच्या स्वाधीन मुले करुन ती तेथून निघून गेली. पति विवस्वान याला काही कळविले नाही. त्याने सरण्यूच घरी आहे असे समजून सरण्यूने आणून ठेवलेल्या स्त्रीशी एकांत केला. ती गर्भवती झाली तिला मुलगा झाला हाच मनु होय. मग विवस्वानाला कळले की ही स्त्री सरण्यू नाही दुसरीच कोणी आहे. तिला टाकून तो सरण्यूच्या शोधार्थ निघाला.

सरण्यू घोडीचे रुप घेऊन भटकत आहे हे विवस्वानाला कळले. तो सुंदर घोडा झाला. सरण्यूने त्या घोड्याकडे पाहिले. ती त्याच्या जवळ मैथुनार्थ आली. त्या घोड्याने मागून आरोहण केले. प्रेमक्रीडेच्या भरात वीर्य जमीनीवर पडले. त्या वीर्याचा तिने नाकातून वास घेतला त्यापासून ती गरोदर झाली पुढे तिला दोन मुलगे झाले. एकाचे नाव नासत्य व दुसऱ्याचे दस्त. अश्विनी कुमार ते हेच. (बृहदेवता)

अभवत् मिथुनं त्वष्टुः सरण्यूस्त्रिशिरा सह। स वै सरण्यूं प्रायच्छत् स्वयमेव विवस्वते।

ततः सरण्यां जज्ञाते यम यमौ विवस्वतः। तौ चाप्युभौ समावेत जायां स्ताभ्यां तु वै यम।

सृष्टा भर्तुः परोक्षंतु सरण्यूः सदृशीं स्त्रियम्। निक्षिप्य मिथुनं तस्या अश्वा भूत्वा प्रचक्रमे।

अविज्ञानात् विवस्वांस्तु तस्यां अजयनयत् मनुं। राजर्षिः अभवत् सोऽपि विवस्वान् इव तेजसा।

स विज्ञाय त्वपक्रान्तां सरण्यू अश्वरुपिणीम्। त्वाष्ट्रीं पतिं जगामाशु वाजी भूत्वा सलक्षणं। मैथुनाय उपचक्राम तांच तत्र आरूरोह स :। ततः तयोस्तु वेगेन शुक्रं तत् अपतत् भुवि।

आघ्रातमात्रात् शुक्रान् तु कुमारौ संबभूवतुः। नासत्यैश्च दस्तश्च यौ स्तुतातौ अश्विनौ इति।

### सरमा

बृहस्पती, इंद्राचा राज पुरोहित. त्याच्याजवळ दुधाळ गाई होत्या. पणीनी त्या गाई पळवल्या. डोंगरी गुहेत लपवून ठेवल्या. बृहस्पतीने इंद्राकडे तक्रार केली. गाईच्या शोधासाठी इंद्राने आपली विश्वासू सरमा पाठवून दिली. ती फिरत रसानदी ओलांडून पणीच्या प्रदेशात आली. अखेर पणीनी गाई लपवून ठेवलेल्या जागी आली. पणीना संशय आला म्हणून तिला विचारतात. तू कोण का आलीस. एवढा लांबचा प्रवास का केलास. तुला श्रम झाले नाहीत ना? तुला भीती कशी वाटली नाही. ही रसा नदी दुथडी भरुन वाहाती आहे. तू कशी ओलांडून आलीस?

सरमा– पणी हो मी इंद्राची दूती आहे. तो इंद्र रक्षण करीत असल्याने कोणाची व कशाची भीती मला वाटली नाही व वाटत नाही. मीही रसा नदी सहज ओलांडून आले तथा रसानां अतरत् पयांसि। ऋ. १०.१०८.२

पणी–तो इंद्र आहे कसा? तो आमच्या येथे येईल काय? आणशील त्याला इथे? त्याची दृष्टी कशी काय आहे? कीहक् इंद्रः सरमे। कादृशीका – ऋ १०.१०८.३

सरमा– काय सांगू पणीनो त्याला कोणी मारणारा नाही. तो मात्र सर्वांना मारील. नाहं न वेद दभ्यं दभत्स।

पणी–आम्हाला मारील?

सरमा–हो तुम्हाला चांगला जमीनीवर लोळवील. त्याच्याशी लढून फुकट मरुन जाल. ''हता इन्द्रेण पणवः शयध्वे।''

पणी– लढाई शिवाय गाई कशा परत मिळतील? कोण तशाच घेऊन जाईल. कस्त एना अव सृज द्युधि। आम्ही पणी हातात बांगड्या भरल्या आहेत काय? आमची हत्यारे तीक्ष्ण आहेत. (अस्माकं आयुधा सन्ति तिग्मा) मग तुझा इंद्र आमचे काय करणार?

सरमा– काय बोलता हे बायकासारखे खरोखर पापी माणसारखी भाषा बोललात. ''असन्यावः पणयो वचांसिं। अतिषण्यास्तन्व ः। सन्तु पापीः।''

पणी– तो इंद्र येईल तेव्हाची गोष्ट. आमची रसा नदी आहे मध्ये तो ती कशी ओलांडून येणार?

सरमा– वेड्यानो तुमचा हा भ्रम आहे. रसा त्याला मुळीच अडवू शकणार नाही. ''न तं गूहंतिस्त्रवतो गभीरा।'' हे भाषण ऐकून पणी घाबरले. मग त्यानी बोलणे बदलले. सरमे तुला मोठी भाग्यवती आम्ही करु.

सरमा– माझे ऐका. इंद्राचे सख्य हवे असल्यास मुकाट्याने गाई सोडून द्या. शहाणे व्हा. मृत्यूला आमंत्रण देऊ नका. ती रसा त्याला अडवू शकणार नाही.(अधृष्टो व एनवा अस्तु पन्थाः। ) गाई सोडा नाहीतर इंद्रही येईल व बृहस्पतीही येईल. ते दोघे तुमचे पारिपत्य करतील.

पणी–हा आमचा दगडी खजीना बंदिस्त आहे. त्यात गाई घोडे सर्व आहेत. आमचे शूर पणी हातात प्रखर शस्त्र घेऊन त्याचे रक्षण करीत आहेत. मग इंद्र बृहस्पती काय करतील? तू इथे उगाच आलीच.

सरमा–पापी लोकानों तुम्हाला सुबुद्धी सुचेल तर ना? तुम्ही मुकाट्याने गाई सोडा. अंगिरस नवग्व इत्यादी ऋषी येथे येतील तुमचा फडशा पाडतील ते गाई वाटून घेतील मग काय कराल?

पणी–ते राहू दे. तू जाऊन सांगशील तेव्हांची गोष्ट. आम्ही तुला बहिण करुन इथे ठेवू. तू आमच्या जवळ रहा. त्या इंद्राची दूती होऊन कष्ट घेण्यापेक्षा तू बहीण होऊन इथे रहा.

सरमा– काय म्हणता बहीण

पणी–होय बहीण म्हणून सुखात चैनीत रहा.

सरमा– त्या देवाची सर तुम्हाला कशी येणार मी इंद्राला व तुम्हाला दोघानांही ओळखते.

पणी– अगं तुला गाईचा हिस्सा ही देऊ. त्या इंद्राजवळ काय मिळणार? (''अपने सुभगे गवां भजाम'')

सरमा–पणी तुम्ही वेडे आहात मी तुमचा भाऊपण जाणत नाही. ते सर्व इंद्र अंगिरस जाणतील. ''नाहं वेद भ्रातृत्वं नो स्वसृत्वं इंद्रो विदुः अंगिरसश्च।''

पणी– असे म्हणू नकोस.

सरमा–मी खचित सांगते. मी इथून निघून जाईन तेव्हा ते देव इथे येवून गाई सोडवून परत नेतील. तुमचा फडशा पाडतील. आपला जीव वाचवा. तुम्ही येथून दुसरीकडे जा. सरमा निघून गेली. इंद्र बृहस्पती येऊन गाई सोडवून नेल्या.

सेवक प्रामाणिक असावा. लाच लुचपतीला बळी

(पृष्ठ.. २५ वर)

## अध्याय ७ : ज्ञान विज्ञान योग

हा अध्याय गेल्या अंकात अनवधानाने छापला गेला नव्हता. तो येथे देत आहोत व ८ व ९ वा अध्याय ऑक्टो. २०१२ च्या अंकाला छापले आहेत. अनवधानाबद्दल क्षमस्व.

(मराठीत ओवी बद्ध भाषांतर)
ज्ञान विज्ञानाची माहिती ।
सर्वांभूतीं परमात्म्याची वसती ।।
अभक्तांची निंदा, भक्तांची महती ।
ज्ञान विज्ञान योग सातवा ।।

**श्रीभगवान पुढे सांगतात :**

योगाभ्यास करितां माझ्या आश्रयाने । तन्मयतेने, निःशंक चित्ताने ।। तेव्हां मला समग्रतेने । कैसे जाणावे ऐक तू ।।१ ।।

जे जाणिता अवशिष्ट काही । जगतीं या दुजे उरत नाही ।। ते ज्ञान आणि विज्ञानही । पूर्णपणें तुज सांगतो ।।२ ।।

हजारोंतून एखादा उठतो । माझ्या प्राप्तीस्तव प्रयत्न करितो ।। परंतु खरा ज्ञानवंत होतो । त्यांतीलही एखादा ।।३ ।।

जमीन, पाणी, अग्नि, हवा । आकाश, मन, बुद्धि, अहंकार आठवा ।। या अष्टधा तत्वांचा मेळावा । अपरा प्रकृती जाणावी ।।४ ।।

पाहूनि श्रेष्ठ परा प्रकृती । जिची चराचरांत आहे वसती ।। संपूर्ण जगताची धारणा शक्ती । तीही घेई समजून ।।५ ।।

या सर्व जगताचे सृजन । होते दोन्ही प्रकृतींपासून ।। म्हणून सकलांचे उगमस्थान । शेवटही मीच असे ।।६ ।।

काहीही नाही माझ्यावाचून । मीच उत्पत्ति लय स्थान ।। मीच सर्वत्र सूत्रासमान । मालेमधील, मण्यांच्या ।।७।।

चंद्रसूर्याची प्रभा, पाण्यांतील रस । वेदांतील ॐकार, पुरुषांचे पौरुष ।। यांत जाणावा माझा वास । आकाशाच्या शब्दांतही ।।८।।

मीच पृथ्वीचा सुगंध पावन । सकल भूतमात्रांचे जीवन ।। तपस्वी जनांचे तपाचरण । अग्नीचे दाहक तेजही ।।९ ।।

सर्व पदार्थांचे सनातन बीज । बुद्धिमंतांच्या बुद्धीचे ओज ।। तेजस्वी पुरुषांचे तेज । तेही मीच जाण तू ।।१० ।।

बलवंतांचे बल मीच आहे । जे अनासक्त , वासनारहित राहे ।। धर्मसंमत कामही मीच पाहे । सर्वांठायी असणारा ।।११ ।।

सात्विक, राजस, तामस भावना । त्यांची उत्पत्ति मजपासून जाणा ।। माझ्यामध्येच स्थान त्याना । मात्र त्यांच्यात मी नसे ।।१२ ।।

या त्रिगुणात्मक पदार्थांनी । हे जगत मोहित होऊनि ।। मजला खरेखुरे न जाणी । अव्यक्त आणि गुणतीत ।।१३ ।।

ही माझी माया त्रिगुण । तरून जाणे महाकठीण ।। जे भक्त येती मजला शरण । त्यानाच शक्य असे हे ।।१४ ।।

मूढ नराधम जे कुकर्मे करिती। मायेमुळें जे अविवेकी बनती।। आसुरी भावनांच्या आहारी जाती। ते न करिती भजन माझे ।।१५।।

चतुर्विध सदाचारी साधक असती। कोणी संसार सुखे मागती।। संकटग्रस्त, कोणची जिज्ञासू वृत्ती। काही प्रत्यक्ष ज्ञानवंत।।१६।।

निष्काम भक्त असा ज्ञानी। एकनिष्ठेने भक्ति करोनि।। मला सदैव प्रिय आप्त मानी। मलाही तो प्रिय असे।।१७।।

हे सर्व भक्त उत्तम असती। परी ज्ञानी माझीच प्रतिकृती।। युक्तचित्तें माझा आश्रय करिती। अंती येती मजकडे ।।१८।।

सर्वत्र वासुदेव हे ज्याना ज्ञान। ते भक्त मिळती मजला येऊन।। अनंत जन्मांची ही संचित साठवण। परी हे अति दुर्लभ असे।।१९।।

ज्यांच्या जैशा अपेक्षा असती। ते तैशा देवतांना भजती।। ज्यांची जैशी स्वभाव प्रकृती। निवडती देव त्याप्रमाणे।।२०।।

आपुल्या देवावरी श्रद्धा ठेवून। करिती उपासना, पूजन, अर्चन।। स्थिर करितो मी त्यांचे मन। त्या देवाच्या भक्तिमध्यें ।।२१।।

अशा स्थिर श्रद्धेने युक्त होवून। करी जो इष्ट देवाचे आराधन।। त्याचे फल मी देतो मिळवून। माझ्या मतें योग्य ते ।।२२।।

परी ते फल संपणारे असते। जे अल्पबुद्धीने प्राप्त होते।। त्या देवांकडे जाती भक्त ते। मजकडे येती माझे भक्त।।२३।।

अव्यक्तांतून मी साकार होतो। ऐसे मूढ अज्ञानी मानतो।। माझे खरे रुप न जाणतो। अव्यय आणि उत्तम।।२४।।

मला नसे उत्पत्ति विनाश। ज्ञान नसे हे मूढ जनांस।। मायेचे आवरण माझ्या रुपास। त्यामुळें मी दिसत नसे।।२५।।

झालेले, असणारे, होणारेही। जाणतो मी सकल भूतमात्रही।। परी मला न जाणे कोणीही। माझे भक्त वगळता।।२६।।

इच्छा द्वेष यांपासून। सुख दुःखादि द्वंद्वे उपजून।। त्याने प्राणिमात्र मोहून। भ्रमित होती, अर्जुना।।२७।।

दृढभावाने उपासना करितो। सर्व पापांतून मुक्त होतो।। माझी भक्ती जो करीत राहातो।। दूर सारोनि मोहाना।।२८।।

माझ्या आश्रयाने प्रयत्न करुन। मुक्त होती जरा मृत्यू पासून।। त्याना ब्रह्म अध्यात्म उमजून। समजती सर्व कर्मेही।।२९।।

अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ तथा। यांसह मजला जाणती स्वरुपतः।। अंतकाळ त्यांचा सामीप येतां। स्मरण माझे ठेविती।।३०।।

रहस्य विज्ञानसहित ज्ञानाचे। वर्णन सर्वव्यापी भगवंताचे।। मोठेपण भगवद्भक्त ांचे। आसुरी लोकांचे अवगुण।। व्यक्ती तितक्या प्रकृती। वेगवेगळी दैवते भजती।। ईश्वराला त्याचे भक्तचि जाणती। ज्ञान विज्ञान योग समाप्त।।

।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

(मराठीत ओवी बद्ध भाषांतर)
भक्तीचा प्रभाव, भगवंताची स्तुति ।
योगशक्ति, ईश्वरी अंश विभूती ।।
श्रीकृष्ण स्वतः वर्णन करिती ।
विभूतियोग तो दहावा ।।

**श्रीभगवान पुढे सांगतात :**

तुझे माझ्यावरचे प्रेम पाहून । परम प्रभावी हितकारी वचन ।। सांगतो तुझे कल्याण इच्छून । ऐक महाबाहो धनंजया ।।१ ।।

सर्व देव महर्षीगण । त्यांना नसे मम जन्माची जाण ।। त्यांच्याही जन्माचे आदिकारण । सर्व प्रकारे मीच असे ।।२ ।।

सर्वेश्वर, अनादि, जन्मरहित । ऐसे मला जो जाणीत ।। तो होऊनि मोहरहित । पापमुक्त ही होतसे ।।३ ।।

बुद्धी, ज्ञान, सावधता । इंद्रियनिग्रह, क्षमा, सत्यता ।। सुख, दुःख, अहिंसा, भीरुता । उत्पत्ती, नाश, अभय ।।

यशापयश, तप, समता । शांतता, दान, तुष्टता ।। या सर्व भावनांचा निर्माता । प्राणिजीवनी मीच असे ।।४-५ ।।

स्वायंभुवादि मनू चार । ज्यांच्यापासून उत्पन्न संसार ।। महर्षी सात त्यांचेनंतर । माझेच मानस पुत्र असती । ।६ ।।

या सर्व माझ्या विभूती । आणि योगशक्ती जाणती।। अविचल योगाची प्राप्ती । त्यांना होते निःसंशय ।।७ ।।

माझ्यांतून सर्व उपजते । माझ्यामुळे सर्व घडते ।। हे जाणून भक्त ज्ञाते । भजती भाव ठेवून ।।८ ।।

मन प्राण मला वाहून । संभाषणी माझे गुणवर्णन ।। माझ्यांत सदैव रममाण राहून । संतोष मिळतो भक्तांना ।।९ ।।

निरंतर प्रेमपूर्वक ध्यानाने । भजती मला भक्ति भावाने ।। ते येतील माझ्याकडे ज्याने । असा बुद्धीयोग देतो मी ।।१० ।।

अशा भक्तांचा करण्या उद्धार । मनीचा अज्ञानजन्य अंधार ।। तेजस्वी ज्ञानदीपाने दूर । अद्वैत भावे करीतो मी ।।११ ।।

अर्जुन विचारतो आहे :

परब्रह्म, परमधाम, परम पावन । म्हणती तुला सर्व ऋषीजन ।। दिव्य पुरुष, आदिदेव, सनातन । अजन्मा आणि सर्वव्यापी ।।

त्रिलोकगामी नारद देवर्षी । असित, देवल, व्यास महर्षी ।। तेच तूही स्वतः सांगशी । देवाधिदेवा श्रीकृष्णा ।।१२-१३ ।।

सत्य मानतो मी तुझे वचन । केशवा जे करिसी कथन ।। देव दानवांही नसे ज्ञान । तुझ्या मुळ रुपाचे ।।१४ ।।

भुतेश्वर, निर्माता भूतांचा । देवादिदेव, पालक जगाचा ।। अससी तू स्वतःच स्वतःचा । पुरुषोत्तमा जाणकार ।।१५ ।।

तुझी दिव्य रुपें कोणती । कवणे ठायीं अंशमात्रे वसती ।। त्या सर्व दिव्य विभूती । तूच मला सांगाव्या ।।१६ ।।

कोणत्या वस्तूत तुला पहावे । कैसे निरंतर चिंतन करावे ।। मनन करुन तुला जाणावे । सांग मला, योगींद्रा ।।१७।।

तुझाा योग आणि विभूति । सविस्तर सांगाव्या मजप्रति ।। तुझ्या अमृत वाणीने तृप्ती । होत नाही, जनार्दना ।।१८।।

श्रीभगवान सांगतात :

ऐक माझ्या विभूति काही । निवडक वेचक आहेत याही ।। माझ्या विस्ताराला अंत नाही । आता सांगतो, कुरुश्रेष्ठा ।।१९।।

आत्मा सर्व भूतांच्या अंतरीचा । सृजन, धारण, नाशही त्यांचा ।। कर्ता करविता या विश्वाचा । गुडाकेशा, मीच आहे ।।२०।।

विष्णू, बारा आदित्यांतील । तेजस्वी सूर्य किरणशील ।। मरीची वायू, एकुणपन्नासांतील । नक्षत्राधिप चंद्र मी ।।२१।।

तीन वेदांत सामवेद मी । अमरांचा राजा इंद्र मी ।। प्राणिमात्रांची चेतना मी । इंद्रियामधे मानस ।।२२।।

शंकर, अकरा रूद्रांमध्ये । कुबेर, यक्षराक्षसांमध्ये ।। अग्नि, आठ वसूंमध्ये । पर्वतांमध्ये मेरु मी ।।२३।।

देव पुरोहित बृहस्पति । कार्तिकस्वामी सेनापती ।। जलराशींत सागराची महती । मीच जाण अर्जुना ।।२४।।

भृगृऋषी महर्षीतील । ॐ एकाक्षर वाणींतील ।। जपयज्ञ सर्व यज्ञांतील । स्थिर वस्तूंत हिमालय मी ।।२५।।

वृक्षांत वृक्ष पिंपळाचा । नारद, प्रमुख देवर्षींचा ।। चित्ररथ, मुख्य गंधर्वाचा । कपिल, सिद्धमुनींमध्ये ।।२६।।

अमृतोत्पन्न अश्व उच्चैःश्रवा । गजेंद्रांत ऐरावत मानावा ।। मानवांतील राजा जाणावा । माझा अवतार अंशाने ।।२७।।

शस्त्रांत इंद्राचे वज्र मी । गाईमध्यें कामधेनू मी ।। प्रजोत्पत्ति कर्ता कामदेव मी । आणि वासुकी सर्पराज ।।२८।।

अनंत, राजा नागांचा । वरुण, अधिपति जलाचा ।। अर्यमा, मुख्य पितृगणांचा शासनकर्ता यमराज मी ।।२९।।

दैत्यांमध्ये प्रल्हाद मी ।। समय गणक काळ मी ।। वनराज, पशूंचा राजा मी । गरुड, राजा पक्षांचा ।।३०।।

वायू मी अति पावन । शस्त्रधारी मी राम महान ।। जलचरी मकर माझे स्थान । जलवाहिनी गंगा मी ।।३१।।

सृष्टीचा आदि मध्य अंत । ब्रह्मविद्या चौदा विद्यांत ।। वाद चर्चा करणारांत । तत्वनिर्णायक वाद मी ।।३२।।

समासांत द्वंद्व, अक्षरांत अकार । चतुर्मुख ब्रह्मा पालनहार ।। अक्षयकाल गतिमान निरंतर । मीच आहे जाण तू ।।३३।।

स्त्रीदेवता कीर्ती, वाणी, स्मृती । श्री, मेधा, क्षमा, धृती ।। मीच होणाऱ्या वस्तूंची उत्पत्ति । सर्वेचि मृत्यू सर्वनाशाक ।।३४।।

बृहत्साम स्तोत्र, स्तोत्रांत। गायत्री छंद, छंदात।। मार्गशीर्ष मास, महिन्यांत। वसंतऋतू ऋतूंमध्ये।।३५।।

कपटी लोकांचा जुगार। तेजस्वी वस्तूंचे तेजरुप सार।। सात्विकांचे सत्व अपार। विजय, निश्चय मीच असे।।३६।।

यादवांत मी वासुदेव। धनंजय तृतीय पांडव।। शुक्राचार्य कवि पुंगव। मुनींमध्ये व्यास मी।।३७।।

शासनकर्त्यांचे शासन। विजयेच्छूंचे नीति नियमन।। ज्ञानवंत लोकांचे ज्ञान। गुप्त गोष्टींत मौन मी।।३८।।

उत्पत्तिकारण भूतमात्रांचे। मीच जाण अर्जुना साचे।। माझ्याविना चराचर सृष्टीचे। असंभव आहे अस्तित्व ।।३९।।

माझ्या दिव्य विभूति अनंत। त्यांच्या विस्ताराला नसे अंत।। तुला सांगितल्या थोडक्यांत। अंदाज येण्या, अर्जुना।।४०।।

ऐश्वर्य शक्ती आणि श्रीमंती। यानी ज्या वस्तू शोभती।। माझ्याच अंशाने त्यांची उत्पत्ति। ऐसे निश्चित समजावे।।४१।।

हे सर्व जाणणे आवश्यक नसे। चराचर माझी माया असे।। संपूर्ण विश्व मी व्यापिले असे। एका अंशाने केवळ।।४२।।

आपल्या योगक्षेमाचा भार। सोपवून सर्वस्वी भगवंतावर।। त्यालाच पहावे सभोवार। चराचर वस्तूंमध्ये।। अर्जुन विचारी परमेश्वरा। सांगावे विभूति विस्तारा।। विभूति वर्णन भगवंतद्वारा। विभूति योग समाप्त।।

।। श्रीकृष्णार्पणमस्तु।।

**श्री. वा. प. पटवर्धन**
द्वारा सौ. जया धनपाल शहा,
ए १/११ श्री महावीर नगर,
आयकॉन हास्पिटल समोर, मानपाडा,
डोंबिवली पूर्व ४२१२०१

●●●

(पृष्ठ २० वरुन)

पडणारा नसावा. स्वामी सेवा जागरुकतेने करावे याचे प्रतिनिधित्व सरमा करते. (सरमा ही देवशुनी देवाकडची कुत्री. शोध लावण्यासाठी कुत्र्याचा उपयोग ऋग्वेद काळीही केलेले आढळते.)

(या लेखातील माहिती 'ऋग्वेद दर्शन' लेखक श्री. रा. गो. कोळंगडे यांच्या ग्रंथाच्या आधारे संपादित केलेली आहे.)

(यम, यमी यांचा संवाद तसेच सरमा व पणी संवाद प्रदीर्घ असून त्यातून बऱ्याचशा तत्कालीन व्यावहारिक गोष्टींचा उलगडा होतो.) ख्यातनाम स्त्रियांची जी यादि सुरुवातीला दिली आहे. त्यापुढील आकडे-मंडळ, सूक्त व ऋचा ह्या गोष्टी निदर्शित करतात. यापैकी काहीच स्त्रियांचा या लेखात उल्लेख केलेला आहे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

●●●

**'पूतना वध'. वृत्त कलिंदनंदिनी**

**अती भयेच कंस त्रस्त शापवाणि आठवी**
**कळया खुडावया समस्त पूतनेस पाठवी**
**शिरोनि गोकुळामधे मनात दुष्ट कामना**
**किती अजाण बालकेउगाच मारि पूतना ।।१।।**

**स्तनास माखुनी विषा कुलीन घेइ रूप ते**
**उरी धरोनि कोमलांग अर्भकांस मारते**
**न तेधवा मुळी कुणीच येइ जीव रक्षणा**
**किती अजाण बालकेउगाच मारि पूतना ।। २ ।।**

**कुलीन गोपिका बनून ती हळूच येतसे**
**करावयास दुग्धपान बाळकृष्ण घेतसे**
**नसे कुणास ध्यान सर्व व्यग्र देव अर्चना**
**किती अजाण बालकेउगाच मारि पूतना ।।३ ।।**

**हरी करी बळेबळे विषारि दुग्ध प्राशन**
**न सोडु देइ राक्षसीस आपुलेच आसन**
**हरे गुणास वीषही सवेच नंद नंदना**
**अखेर दुष्ट पूतने त्यजोनि जाइ चेतना ।। ४।।**

**अजस्त्र राक्षसी पहात गोप गोकुळातले**
**जनांनि आपुल्या मुखात अंगुलीस घातले**
**बघोनि सर्व दृश्य हो अवर्णनीय भावना**
**हरीमुळे नवा विशाल अर्थ येइ जीवना ।।५ ।।**

गोकुळात त्या बाळाच्या आगमनानं पसरलेल्या आनंदाचं वर्णन कोणी आणि किती करावं? केवळ शब्दांच्या पलिकडल्या अशा सुखकर भावनांचा तो मनोरम सोहळा सतत बारा दिवस वाजत आणि गाजत राहिला.

अखेर बाळाचं नामकरण करण्याची घटिका जवळ आली. त्यादिवशी सकाळी पुरोहितांनी स्वस्तिवाचन करून अनिष्ट ग्रहांची शांती केली. गोपांचा आनंदोत्सव चालूच होता. शेवटी आचार्यांनी सर्वांना शांत करून धीरगंभीर आवाजात म्हटलं, ''या बालकासमान तेजस्वी, लोभस आणि गोजिरवाणं बालक आम्ही अजून कुठेही पाहिलं नाही. आम्हाला याच्या अंगी आणि याच्या कूंडलीत राजलक्षणांचा आणि महायोग्यांच्या लक्षणांचा अभूतपूर्व संगम दिसतो. खरोखर असं दिव्यलक्षणी बालक आपल्या गोकुळात जन्माला येण्यासाठी आपणा सर्वांनीच किती एक पिढया सत्कर्म केली असतील! अशा या त्रिभुवनमोहन बालकाला दृष्ट लागू नये म्हणून गालावर काजळाचं बोट टेकवितात तद्वत मी याचं नाव 'कृष्ण' ठेवतो.''

त्यानंतर उसळलेल्या मंगल वादयांच्या गजरानं सर्व आसमंत कित्येक घटिका दुमदुमत राहिला. कित्येकांनी भावनेच्या भरात कृष्णाला गोविंद, गोपाळ, मुकूंद, श्रीहरी, कान्होबा अशी विविध नावं ठेवली. पाळण्यात पहुडलेल्या कृष्णाचे वारंवार कितीही पापे घेतले तरी कोणाचंच समाधान होईना. कृष्ण मात्र या सर्वांकडे टुकुटुकु पहात अंगठा चोखत आणि हसत स्वस्थ पडून होता.

इकडे मथुरेत मात्र कंसाचं अवसान पार गेल्यासारखं झालं होतं. ध्यानी, मनी, स्वप्नी देवकीच्या आठव्यानं त्याचा जणू पिच्छाच पुरवला होता. आठव्याला नष्ट करून तो आपल्या आणि

सर्वांच्याच आठवातूनही पूर्ण घालवून टाकण्याचा त्यानं चंग बांधला होता. पण कृष्णाचा नेमका ठावठिकाणा त्याला ठाऊक नसल्यानं त्याची पंचाईत झाली होती.

आपल्या शय्येवर पडून असाच एकदा कंस विचार करत असताना त्याला एक अत्यंत अभद्र कल्पना सुचली. विवेकशून्य संहार आणि विध्वंस करायचा एकदा निश्चय झाला की कल्पनाशक्ती चौखूर उधळते हा अनुभव काही आजकालचाच नाही बरं का मंडळी! कंसानं तातडीनं आपल्या विश्र्वासातल्या पूतना या महाभयानक राक्षसीला पाचारण केलं आणि म्हटलं, ''पूतने, तुझ्या सुदैवानं आज माझ्यावरची तुझी निष्ठा दाखवण्याची एक दुर्लभ संधी तुला प्राप्त झाली आहे.'' तिनंही उत्सुकतेनं म्हटलं, ''महाराज आज्ञा असावी.'' संतोषानं कंसानं हुकूम सोडला, ''पूतने, गेल्या सहा महिन्यात भूतलावर जेवढी म्हणून अर्भकं जन्माला आली असतील त्या सर्वांना तू ठार मारावंस! असं एकही अर्भक जिवंत आढळलं तर लक्षात ठेव, तुझा मृतदेह यमुनेच्या काळया पाण्यावर तरंगताना मथुरावासीय पाहतील!''

त्या भयानक कल्पनेनं पूतनेसारखी राक्षसीही क्षणभर शहारली. परंतु कंसाज्ञेपुढे तिचा निरूपाय झाला. त्या क्षणापासून लागलीच तिनं त्या आज्ञेची अम्मलबजावणी करण्यास प्रारंभ केला. मथुरेमधल्या अनेक लहानग्यांना यमसदनाला धाडून ती मथुरेशेजारीच असलेल्या गोकुळात येऊन पोहोचली देखील...

●●●

## मनोवृत्ति

कोट्याधीशापासून भिकाऱ्यापर्यंत सर्वजण शान्ततेची, शांततामय जीवनाची अपेक्षा करीत असतात. पण गंमत अशी कीं आपल्या शांततेकरतां दुसरीकडे अशांतता निर्माण करीत असतात. एकीकडे शांति भंग पावली तर तिचे दुष्परिणाम दुसरीकडे उमटतात. कारण ते शांततेचे प्रयत्न व्यक्तिनिष्ठ असतात, शिवाय ते केवळ भौतिक असतात. शांति ही बाह्यवस्तुनिष्ठ नसते, ती मनोनिष्ठ हे लक्षांत घेऊन आद्य शंकराचार्य म्हणतात- 'मनोनिवृत्तिः परमोपशान्ति:, मन भौतिक विषयांपासून निवृत्त झालें तर खरी शान्तता परमश्रेष्ठ सार्वत्रिक शांतता लाभते.

शांतपणें नासिकाग्रावर दृष्टि स्थिर करुन अदमासें दहा मिनिटें स्थिर रहा. पहिली नऊ मिनिटें मन विषयांशी खेळत राहील पण दहावें मिनीट विषय पराङ् मुख राहील. म्हणजेच शांत राहील. दहाव्या मिनिटाची ही मनोनिवृत्ति परमशांती आहे. खरीखुरी शांतता आहे. ती मिळवायचा प्रयत्न करा.

प्राणाय नमो यस्य सर्वमिदं वशे।
यो भूतः सर्वस्येश्वरो यस्मिन् सर्वं प्रतिष्ठितम्।।
अर्थवेद ११.४.१

ज्याच्या आधीन हे सर्व विश्व आहे. त्या प्राणाला माझा नमस्कार असो. तोच सर्वांचा ईश्वर आहे आणि त्याच्यामध्येच हे सर्व जग राहते.

प्राण शब्द सर्वांच्या परिचयाचा आहे. प्राणशक्तीच्या निरोधावर आधारलेल्या शिवस्वरोदय या शास्त्रात शिवाने पार्वतीला प्राणविषयक उपदेश करताना असे म्हटले आहे की प्राण हाच सर्वश्रेष्ठ मित्र आहे. तोच सखा म्हणजे जवळचा मित्र आहे. हे सुमुखि, प्राणाच्या बरोबरीचा बन्धु दुसरा कोणी नाही, दुसरा कोणी नाही.

प्राण एव परं मित्रं प्राण एव परः सखा।
प्राणतुल्यपरो बन्धुर्नास्ति नास्ति वरानने।।

**प्राण म्हणजे काय?**

प्राण म्हणजे ब्रह्मांडातील मूलतत्त्व. प्राण म्हणजे शरीराच्या आत संचार करणारा वायु.शरीरान्तःसंचारी वायुः। प्राण म्हणजे मुख आणि नासिका यांच्याद्वारे आत येणारे आणि बाहेर जाणारे तत्त्व मुखनासिकाभ्यां निष्क्रमणप्रवेशनात् प्राणः। या दोन्ही व्याख्या भारतीय संस्कृतिकोशात दिल्या आहेत. परंतु या दोन्ही व्याख्या अंतिम नाहीत हे पुढे लक्षात येईल. प्राणसंकल्पनेचा उगम वेदवाङ्मयात झाला व नंतर ही संकल्पना समृद्ध होऊन परिणत झाली. प्र+अन् (२ प.प.) या धातूपासून प्राण शब्द सिद्ध झाला आहे. प्रणिति म्हणजे श्वास घेणे म्हणून प्राण शब्दाचा सामान्य अर्थ श्वासोच्छ्वास असा आहे.

**प्राण शब्दाचा प्रथम निर्देश–**

प्राण शब्द प्रथम ऋग्वेदात आणि नंतर इतर वेदात आणि उपनिषदांत आला आहे. परमेश्वराच्या प्राणशक्तीपासून वायूची उत्पत्ती झाली असे पुरुष सूक्तात म्हटले आहे. प्राणाद्वायुरजायत (ऋ १०.९०.१३)अगदी असाच उल्लेख अथर्ववेदात (१९.६.७) आला आहे. प्राण म्हणजे आयुष्य होय. (ऋ १.६६.१). प्राणाला 'असु' असेही म्हणतात. हे प्राणा तू आम्हाला सुखी कर, तू आमचे जीवन दीर्घ कर. (ऋ १०.५९.५ व १०.५९.६). यजुर्वेदात प्राणसंवर्धन करण्याचा उपदेश आहे. प्राणस्त अप्यायताम् (यजु.६.१५). आत्म्याच्याच शक्तीने प्राण शरीराच्या अंगाअंगात संचार करतो.(यजु.६.२०). माझ्यात प्राण आणि अपान बलवान होऊन राहोत. (यजु. ३६.१). प्राण हा शरीराचा राजा आहे. राजा मे प्राणः (यजु. २०.५). माझे आयुष्य यज्ञाने वाढो, माझा प्राण यज्ञाने समर्थ होवो – आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो यज्ञेन कल्पताम् (यजु. ९.२१ इत्यादी) अथर्ववेदात (११.८.२६) प्राणाची प्राण, अपान, व्यान आणि उदान ही चार नावे आली आहेत.

**प्राणसूक्त –**

अथर्ववेदाच्या ११ व्या कांडात चौथे सूक्त प्राणसूक्त आहे. या सूक्तामध्ये २६ मंत्र आहेत. या सूक्ताच्या सुरवातीस प्राणाला वंदन केले आहे.

तो मंत्र या लेखाच्या सुरवातीस दिला आहे. प्राणाचे महत्त्व या सूक्तांत सांगितले आहे. या सूक्तातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे आहे.

प्राण जसा शरीरात आहे तसा बाहेरही आहे. आपल्या शरीरात श्वास आणि उच्छ्वास रुपाने प्राण चालू असतो आणि शेवटपर्यंत तो हे कार्य करतो. आगमन आणि गमन करणाऱ्या प्राणाला नमस्कार असो. प्राण जीवनशक्ती आहे म्हणून देवसुद्धा प्राणाची उपासना करतात. प्राणच सर्वांचा प्रेरक आहे. प्राणाला मातरिश्वा असेही म्हणतात. सर्व झोपले तरी प्राण कधी झोपत नाही. शरीराचा कोणताच भाग प्राणशक्तीच्या मदतीशिवाय कार्य करु शकत नाही.

इंद्रियादिकांमध्ये जो व्यापक प्राण आहे तोच गर्भाच्या आंत चालू असतो. प्राण गर्भात कार्य करीत असतो. प्राणाच्याच प्रेरणेने गर्भ बाहेर येतो आणि वाढतो. प्राणाची उपासना केल्यामुळे दीर्घायुष्य प्राप्त होते. सर्वांनी प्राण स्वाधीन करुन घ्यावा व त्याच्या शक्तीने बलवान व्हावे. पंडित सातवळेकर यांनी प्राणसूक्ताचे पुस्तकरुपात संपादन केले आहे. चारही वेदांत आलेल्या प्राणाच्या मंत्रांचा नीट अभ्यास केल्यावर पंडित सातवळेकर यांनी काढलेला निष्कर्ष अगदी सारांशरुपाने पुढीलप्रमाणे देता येईल.

''प्राणशक्तीचा विकास करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्राणायामाबरोबर शुभ विचार धारण करण्याने मोठा लाभ होतो. परमेश्वराच्या उपासनेने प्राणाचे बळ वाढते. सत्कर्माने प्राणाचे पोषण केले पाहिजे.''

**उपनिषदांतील प्राण –**

वेदांप्रमाणे उपनिषदांनीही प्राणाचा नीट विचार केला आहे. प्रस्तुत लेखला शब्दसंख्येची मर्यादा असल्यामुळे वेदांतील आणि उपनिषदांतील अगदी मोजकेच संदर्भ येथे दिले आहेत. उपनिषदे अध्यात्मपर आहेत. ब्रह्म हे उपनिषदांचे वैभव आहे, सारसर्वस्व आहे. तैत्तिरीय उपनिषदात (३.३) प्राणच ब्रह्म आहे असे म्हटले आहे. प्राणो ब्रह्मेति व्यजानात्। येथे पुढे असे म्हटले आहे की सर्व भूते प्राणापासून उत्पन्न झाली आहेत, प्राणाने जिवंत राहतात आणि शेवटी प्राणास जाऊन मिळतात.

सर्व देवांत मुख्य देव कोणता या प्रश्नाचे उत्तर छांदोग्य उपनिषदात (५.१.१) व बृहदारण्यक उपनिषदांत असे दिले आहे की प्राणच सर्वात मुख्य आणि श्रेष्ठ आहे-प्राणो वाव ज्येष्ठश्च श्रेष्ठश्च। प्राण हेच अमतृ आहे – प्राणो वाव अमृतम् (बृहदारण्यक उप १.६.३) प्राण हेच यश आणि बल आहे. प्राणो वै शो बलम्-बृहदारण्यक उप.१.२.६. सूर्य जेव्हा उदय पावतो तेव्हा सर्व दिशांना सूर्यकिरणांद्वारे प्राण पोहोचतात. (प्रश्न उप.१.६.८). केन उपनिषदांत (१.२) असे म्हटले आहे की आत्माच प्राणाचा प्राण आहे. छांदोग्य उपनिषदांत (४.३.३) प्राण हाच सर्व इंद्रियांचा आधार आहे असे सांगितले आहे. याच उपनिषदात पुढे (७.१५.१) प्राणाला माता, पिता, भाऊ, बहिण, आचार्य आणि ब्राम्हण असे संबोधिले आहे.

कौषीतकी उपनिषदांत )३.२) प्राणालाच आयुष्य म्हटले आहे. आयुः प्राणः। प्राणो वा आयुः। आत्म्यापासून प्राण उत्पन्न होतो असे

प्रश्नोपनिषदात (३.३) म्हटले आहे. आत्मन एष प्राणो जायते। चाकाच्या आरा ज्याप्रमाणे मध्यभागी मिळतात त्याप्रमाणे जगातील सर्व वस्तू प्राणात मिळून विलीन होतात. (छांदोग्य उप.७.१५.१).

**प्राणाचे श्रेष्ठत्व –**

उपनिषदे एखादे तत्त्व ठसविण्यासाठी कधी कधी दृष्टान्ताचा वापर करतात. प्राण सर्व इंद्रियांपेक्षा श्रेष्ठ आहे हे दर्शविण्यासाठी छांदोग्य उपनिषदात (५.१.६–१५) इंद्रियकलहाचा प्रसंग आला आहे.

एकदा सर्व इंद्रिये आपल्यामध्ये श्रेष्ठ कोण यासाठी भांडत होती. त्यांना निर्णय करता आला नाही म्हणून ती सर्व प्रजापतीकडे गेली. प्रजापतीने सांगितले की जे इंद्रिय बाहेर गेल्याने शरीर सामर्थ्यहीन व पापिष्ठतर दिसेल ते इंद्रिय सर्वात श्रेष्ठ समजावे. प्रथम वाचा शरीराबाहेर निघून गेली व एक वर्षपर्यंत बाहेर राहिली. ती परत आल्यावर तिला दिसले की आपण नव्हतो तरी शरीर जिवंत राहिले याचे तिला आश्चर्य वाटले. मुका मनुष्य ज्याप्रमाणे न बोलता श्वासोच्छ्वास करतो, डोळ्यांनी पाहतो, कानांनी ऐकतो व जिवंत राहतो त्याप्रमाणे शरीर जिवंत राहिले. त्यानंतर डोळे एक वर्षपर्यंत शरीर सोडून गेले. परंतु आंधळा मनुष्य जगतो त्याप्रमाणे शरीर जिवंत राहिले. नंतर श्रवणेंद्रिय व मन बाहेर निघून गेले. बहिरा मनुष्य जगतो किंवा लहान मूल जगते. त्याप्रमाणे शरीर जिवंत राहिले. या सर्व इंद्रियांवाचून शरीराचे फारसे अडले नाही. परंतु शेवटी प्राण शरीराच्या बाहेर जाऊ लागला तेव्हा सर्व इंद्रिये शरीरापासून तुटून निघाली. त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले. शेवटी सर्व इंद्रिये प्राणास शरण गेली व तू आम्हाला सोडून जाऊ नकोस अशी त्यांनी विनवणी केली. सर्व इंद्रियांनी प्राणाचे श्रेष्ठत्व मान्य केले. असाच दृष्टांन्त थोड्याफार फरकाने कौषीतकी उपनिषदात आला आहे.

मुख्य प्राण एकच आहे. पण शरीरातील निरनिराळ्या कामगिरींमुळे त्याचे प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान असे पाच भाग आहेत. प्राणाने प्राणी जिवंत राहतो, व्यानाने ओझे उचलतो, अपानाने मलमूत्रोत्सर्ग होतो, समानाने हृदयाची क्रिया चालते. उदानाने उच्छ्वास किंवा भाषण केले जाते. पाच प्राणांची कार्ये आणखी आहेत ती विस्ताराने पुष्कळ ग्रंथात आली आहेत. या पाच प्राणांपैकी एकाचे जरी कार्य कमजोर झाले तरी शरीराला अपाय होतो.

**पंचप्राणांची स्थाने –**

अमृतनादोपनिषदात (३४,३५) शरीरातील पाच प्राण कोठे कोठे राहतात याबद्दल माहिती दिली आहे.

प्राण आद्यो हृदि स्थाने अपानस्तु पुनर्गुदे।
समानो नाभिदेशे तु उदानः कण्ठमाश्रितः।
व्यानः सर्वेषु चाङ्गेषु व्याप्य तिष्ठति सर्वदा।

मूळ प्राण हृदयात, अपान गुदामध्ये, समान नाभिप्रदेशात, उदान प्राण कंठामध्ये तर व्यान हा प्राण सर्व शरीराला व्यापून राहतो.

**पंचप्राणांचे रंग –**

अमृतनादोपनिषदांत प्राणांच्या रंगाचेही वर्णन पुढीलप्रमाणे दिले आहे.

रक्तवर्णो मणिप्रख्यः प्राणवायुः प्रकीर्तितः।

अपानस्तस्यमध्ये तु इन्द्रगोपसमप्रभः।
समानस्तु द्वयोर्मध्ये गोक्षीरधवलप्रभः।
आपाण्डर उदानश्च व्यानो ह्यर्चिः समप्रभः।
अमृतनादोपनिषद ३६, ३७.

प्राणवायू लाल रंगाच्या रत्नाप्रमाणे आहे. अपानवायू इन्द्रगोप किड्यांच्या रंगाचा आहे. समान वायू गायीच्या दुधाच्या रंगाप्रमाणे धवल असतो. उदान वायू धूसर रंगाचा तर व्यान अग्निशिखेप्रमाणे तेजोमय असतो.

**उपसंहार –**

शरीरात प्राणाचे महत्व अनन्यसाधारण असल्यामुळे उपनिषदांनी त्याला ब्रह्मामर्यंत नेले आहे. त्याचप्रमाणे प्राण म्हणजे केवळ श्वासोच्छ्वास नव्हे हे पण लक्षात ठेवले पाहिजे. किंबहुना ज्या शक्तीमुळे श्वासोच्छ्वास चालतो ती शक्ती म्हणजे प्राण होय. परमेश्वरानेच प्राणाला उत्पन्न केले आहे. प्राण म्हणजे विश्वव्यापक जीवनशक्ती. प्राणशक्ती हवेत असली तरी हवा म्हणजे प्राणशक्ती नव्हे. प्राण म्हणजे जीव किंवा जीवात्माही नाही. प्राण त्याला साहाय्य करणारी शक्ती आहे. प्राणायामामुळे शरीरातील प्राणशक्ती वाढते. त्याचप्रमाणे आनंदी वृत्ती व पावित्र्य यांनीही प्राणशक्ती वाढते. प्राणशक्ती वाढल्याने रोगबीजे नष्ट होऊन स्वास्थ व आयुष्य वाढते. इंदियभोगात शक्ती कमी खर्च करावी व प्राणशक्ती वाढवावी. रघुवंशातील राजे योगसामर्थ्याने आपला प्राण स्वेच्छेने सोडत असत. योगेनान्ते तनुत्यजाम् याउलट सामान्य माणसांचा प्राण निघून जातो. त्यांच्याकडे प्राणशक्ती नसते.

सात्विक भोजनाने प्राणशक्ती वाढते. म्हणून पुष्कळ हिंदू लोक भोजनाच्या वेळी पाच प्राणांना उद्देशून एक एक घास त्यांना अर्पण करतात. तो घास न चावताना घ्यायची पद्धत आहे. या घासांना प्राणाहुति म्हणतात.

प्राण प्रत्यक्ष दिसत नसला तरी हृदयाची धडपड, नाडीचे ठोके, पचनसंस्थेच्या हालचाली व स्पंदने ही प्राणशक्तीची व्यक्त रुपे आहेत. शरीराला आणि विश्वाला व्यापणाऱ्या प्राणाला नमस्कार असो.

प्राणाय नमः!

**डॉ. श्री. म. भातखंडे**
विजय निवास, कुंटे वाडी,
भास्कर कॉलनी, महात्मा गांधी मार्ग,
नौपाडा, ठाणे-४०० ६०२.
दूरध्वनी : २५४००८११

●●●

### मद्यपी पापी होतो...

चित्ते भ्रान्ति र्जायते मद्यपानम्।
भ्रान्ते चित्ते पापचर्यामुपैति।।
पापं कृत्वा दुर्गतियान्ति मूढाः।
तस्मान्मद्य। नैव पेयम् न पेयम्।।

अति मद्यपानामुळे चित्तांत भ्रान्ति निर्माण होते. चित्ताची-मनाची स्थिरता नष्ट होते. मनाच्या अस्थिरतेनें सारासार बुद्धि नष्ट होते; व त्यामुळे पापाचरणाकडे ओढला जातो. पापाचरण-दुष्कृत्य यांच्यात गुरफटला कीं मानवाच्या अधोगतीला पारावार रहात नाहीं. म्हणून मद्यपान कधींही करु नये.

मातरमपिकामयते सावज्ञम् मद्यपानमत्तः सन्?

मद्यपानानें माणुसकीचे भान हरपते. तो शुद्ध पशू बनतो. जन्मदात्या मातेलाही विसरतो. तिची निर्भर्त्सना करीत तिचा भोग घेऊं इच्छितो.

दुर्दैव भारताचें, आज मानवाला पशू बनविणारी 'दारु पिणे' ही फॅशन झाली आहे.

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

यांत्रिकी, गणिती, रूढ भौतिकी सिद्धांतांना धक्का लावायला सुरुवात केली. रूढ भौतिकीमध्ये अवकाशाच्या त्रिमितीमध्ये आइन्स्टाईनच्या सिद्धांताने चौथ्या मितीची भर टाकली आणि यामुळेच या सर्व बाजू केवळ स्वतंत्र नसून एकमेकांशी संबंधित आहेत, हे विज्ञानाला मान्य करावे लागले. सापेक्षता आणि पुंज सिद्धांताने हे स्पष्टपणे दाखवून दिले की पदार्थाचे अणुरेणू हे घन वस्तू (Solid objects) नसून अमूर्त, निराकार आस्तित्वे आहेत (Abstract Entity), प्रकाशाचे द्विगुणी अस्तित्व, सूक्ष्म कण (Particles) आणि तरंग(Waves) या विरोधाभासाला रूढ भौतिकीमध्ये नक्कीच स्थान नव्हते. नवभौतिकीमुळे वस्तुनिष्ठ, तर्कप्रधान विज्ञानामध्ये व्यक्तिसापेक्षता आणि अंतःप्रेरणेलाही यामुळेच स्थान मिळाले.

वस्तूच्या अणुरेणूप्रमाणेच २० व्या शतकात पेशींच्या अंतरंगांचीही नवीन उकलझाली. यातूनच जैवयांत्रिकीशास्त्राचा जन्म झाला. आजची नलिका बालिका (Test Tube Baby) ते बीज पेशींच्या रोपणापर्यंतचा सगळा प्रवास या नवभौतिकीमुळेच झाला. पदार्थविज्ञाना पलीकडे इतर विज्ञान शाखा स्वतःचा स्वतंत्रपणे विचार करू लागल्या. तरीही आज 'मी कोण' या प्रश्नाचे अजूनही उत्तर सापडत नाही. नवभौतिकीमध्ये आजही गणिती, यांत्रिकी आणि नियतिवादाचा प्रभाव दिसतच आहे. मस्तिष्कशास्त्र (Brain Science) आणि त्याच्या उपशाखांमध्ये प्रचंड संशोधन होऊनही चेतनेच्या (Consiousness) संशोधनामध्ये आजही फारशी प्रगती होताना दिसत नाही. हा अडथळा विज्ञानातील साधनांचा नसून वैज्ञानिकांच्या मानसिकतेचा आहे.

मानवी संस्कृतींचा प्रवास आजच्या पाश्चात्त्य सभ्यतांपेक्षा हजारो वर्षे आधी पूर्वेकडील सभ्यतांमध्ये चालू आहे आणि चेतनाशास्त्रामधील त्यांचे अभ्यास नक्कीच अधिक उजवे आहेत. २० व्या शतकाच्या सुरुवातीला सापेक्षता आणि पुंजवादाच्या प्रवेशानंतर निदान काही दशके तरी भौतिकी वैज्ञानिक किंवा पदार्थ वैज्ञानिक भारतीय तत्त्वज्ञानाकडे वळले होते. आजच्या 'मी कोण' या शोधाच्या प्रवासामध्ये पुन्हा एकदा या तत्त्वज्ञानामध्ये डोकावून पाहणे फायदेशीरच नाही, तर उत्तराच्या जवळ पोहोचण्यासाठी मदत करणारे आहे.

लंडनची द रॉयल सोसायटी व ब्रिटिश ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने 'What it means to be human' या विषयावर ८ मार्च २०१२ रोजी परिसंवाद झाला. या परिसंवादातील दोन सत्रांत सहभागी झालेल्या विद्वानांनी या अनुषंगाने 'मी कोण' या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आपली अभ्यासपूर्ण मते मांडली. हा परिसंवाद लंडनची रॉयल सोसायटी आणि ब्रिटिश ॲकॅडमीच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अभ्यासूंनी तो अवश्य ऐकावा.

●●●

**संपादकीय** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१.
**मुद्रण स्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१.